१८६०

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय वांवा
दा. क्र. १८६०

BVBK-0401760

21 MAR 1985

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.

दा. क्र. १०६० २८।३।८५

विषय का.वा.

वाचनालय बा.वा.
१७६०
२८।२।८५

कथा-दैनंदिनी रोज एक कथा सांगा.

३६० गोष्टी आणि १२ पुस्तकांचा संच.

# कार्तिक

BVBK-0401760

पंढरीनाथ रेगे



अतुल बुक एजन्सी
प्रकाशन

३१७, नारायण पेठ, पुणे ३०

प्रकाशक
ना. गो. जोशी
अतुल बुक एजन्सी
प्रकाशन
३१७, नारायण पेठ,
दैनिक प्रभातसमोर, पुणे ३०.
फोन नं. ४४९५४१

© सर्व हक्क सुरक्षित

पहिली आवृत्ती :
२३ जानेवारी १९८५

मुद्रक :
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिन्टर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०.

# राष्ट्रगीत

जनगणमन अधिनायक जय हे
भारत भाग्यविधाता ।।
पंजाब सिंधु गुजरात मराठा
द्राविड उत्कल वंग ।
विंध्य हिमाचल यमुना गंगा
उच्छल जलधितरंग ।
तव शुभ नामे जागे
तव शुभ आशिष मागे
गाए तव जयगाथा ।
जनगणमंगलदायक जय हे
भारत भाग्यविधाता ।।
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे

मुलांचे मनोरजन आणि बौद्धिक वाढ होण्यासाठी या कथा लिहिल्या आहेत. या कामी भारतीय सांस्कृतिक कोष आणि इतर पौराणिक कथा यांचे अनेक वेळा सहाय्य लाभले. या सर्वांचा मी ऋणी आहे. त्याबद्दल त्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

---

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | बलिप्रतिपदा | ५ |
| २) | भाऊबीज | ७ |
| ३) | हुमायुनाची मानलेली हिंदू बहीण | ८ |
| ४) | अमृतसर | ९ |
| ५) | पुष्करतीर्थ | १० |
| ६) | साक्षीगोपालाची कथा | ११ |
| ७) | ब्रह्मराक्षस | १३ |
| ८) | बिनतोड साक्ष | १५ |
| ९) | सुटका | १६ |
| १०) | गिरनार कथा | १६ |
| ११) | पुंडलिक | १७ |
| १२) | तुलसीविवाह कथा | १९ |
| १३) | दैव | २१ |
| १४) | वैकुंठचतुर्दशी | २३ |
| १५) | त्रिपुरी पौर्णिमा | २४ |
| १६) | गुरूनानक | २५ |
| १७) | पंजासाहिबाची कथा | २८ |
| १८) | देवीव्रत | २९ |
| १९) | गजपर्व उत्सवाची कथा | ३० |
| २०) | पं. जवाहरलाल नेहरू | ३१ |
| २१) | रेणुका तलाव | ३३ |
| २२) | राधाकुंडाची कथा | ३३ |
| २३) | निमळ तीर्थ | ३४ |
| २४) | पंजाबकेसरी लाला लजपतराय | ३५ |
| २५) | जगद्धात्रीची कथा | ३६ |
| २६) | चिक्कू शिंपी | ३७ |
| २७) | विष्णुपंचक व्रतकथा | ३९ |
| २८) | ज्ञानेश्वरांची समाधी | ४० |
| २९) | इंदिरा गांधी | ४१ |
| ३०) | शूर वीराबाई | ४५ |
| ३१) | भीष्मपंचक व्रतकथा | ४७ |
| ३२) | जगदंबा शांतादुर्गा | ४८ |
| ३३) | राई-दामोदर | ४८ |

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय वि...
दा. क्र. 7640 बा-बा
विषय 28/2/85

# १ बलिप्रतिपदा

**कार्तिक** शु. १ . याच तिथीला बलिप्रतिपदा म्हणतात. बळी राजाला पाताळात लोटल्यावर, त्याच्या दानशूरपणावर प्रसन्न झालेल्या वामनावतारूपी विष्णूनं त्याला वर दिला, की– 'कार्तिकी प्रतिपदेचा हा दिवस यापुढं बलिप्रतिपदा म्हणून मानला जाईल.' तेव्हापासून बळीचं नाव या तिथीला जोडलं गेलं. वर्षभरातल्या साडेतीन पवित्र मुहूर्तांपैकी ही तिथी हा अर्धा मुहूर्त गणला गेला आहे.

विक्रम संवत् शकाचा वर्षारंभ (पाडवा) याच दिवशी येतो: म्हणून हा शक मानणारा गुजराती वगैरे लोकांचा व्यापारीवर्ग या दिवशी आपल्या धंद्याच्या हिशेबाच्या कीर्दखतावणीच्या नवीन वह्यांचं पूजन करून त्या सुरू करतात.

या दिवशी गोवर्धनाची पूजा करतात. त्याची गोष्ट अशी–

गोकुळाजवळ गोवर्धन नावाचा पर्वत होता. त्या पर्वतावर श्रीकृष्ण व त्याचे सवंगडी गाई-गुरे चारायला नेत. दिवसभर तेथेच खेळत. तेथे गुरांना खूप चारा मिळे. त्यामुळे गाई-गुरे धष्टपुष्ट होत. गाई खूप दूध देत. गोकुळात दूध, दही व लोणी भरपूर. ते खाऊन तेथील बाळगोपाळ गुटगुटीत झाले होते.


श्रीकृष्ण सर्व गोप-गोपींना म्हणाला, "या वर्षी आपण इन्द्रदेवांची पूजा नाही करायची. या गोवर्धन पर्वताची पूजा करायची. तोच आपला देव." झाले! श्रीकृष्ण म्हणाला ते सर्वांना पटले! सर्वांनी गोवर्धन पर्वताची पूजा केली. दिवसभर मोठा उत्सव केला.

त्यामुळे इन्द्राला आला राग. त्याने काय केले. पाऊस पाडायला सुरुवात केली. धो धो पाऊस पडू लागला. मुसळधार पाऊस. सगळीकडे

पाणीच पाणी झाले. यमुनेला पूर आला. सर्वजण फार घाबरले.

श्रीकृष्ण म्हणाला, " गोवर्धन पर्वताकडे चला. घाबरू नका, तोच आपल्याला आश्रय देईल. "

सर्वजण निघाले गोवर्धन पर्वताकडे. गाई-गुरे-वासरे घेऊन निघाली गोपगोपी. श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत उचलला. उजव्या हाताच्या करंगळीवर एवढा मोठा गोवर्धन उचलला. त्याखाली सर्वांना आसरा



मिळाला. सात दिवस व सात रात्री इंद्राने असा पाऊस पाडला. पण गोवर्धन पर्वताखाली गोकुळातले सर्वजण सुरक्षित होते. शेवटी इंद्र शरण आला. पाऊस थांबला. सर्वजण आपापल्या घरी गेले. श्रीकृष्णाचा पराक्रम पाहून सर्वजण त्याचे गुणगान करू लागले.

गोकुळातील लोक फार सुखी होते. रासलीला, रंगपंचमी वगैरे मजेचे उत्सव ते करीत. श्रीकृष्ण त्यांचा देव. श्रीकृष्णामुळे गोकुळात जणू स्वर्ग अवतरला होता.

## २. भाऊबीज

कार्तिक शु० २ : या तिथीला भाऊबीज तशीच यमद्वितीया मानतात. या दिवशी यम आपली बहीण यमुना हिच्या घरी बऱ्याच दिवसांनी जेवायला गेला, म्हणून ही यमद्वितीया म्हटली जाऊ लागली. या दिवशी पुरुषानं स्वतःच्या घरी न जेवता आपल्या बहिणीच्या घरी जायचं, आणि तिला वस्त्रालंकार वगैरे भेट देऊन तिच्या घरी भोजन करायचं. सख्खी बहीण नसलीच, तर एखाद्या मानलेल्या बहिणीकडं जेवावं, असं सांगितलं आहे. भाऊबीजेसंबंधी अनेक कथा प्रचलित आहेत, त्यांतली एक अशी–

(१) यमानं एकदा आपल्या दूतांना आज्ञा केली–"ज्याला कुणीसुद्धा आजवर कधी शिवी दिली नाही, अशा माणसाला घेऊन या." तर अशा असामीचा शोध घेत यमदूत पृथ्वीवर फिरू लागले. एका माणसाच्या विवाहित बहिणीला ही बातमी कळली. तिच्या सुस्वभावी



भावाला कधीही कोणी शिवी दिलेली नाही, हे ती जाणून होती. अर्थात् त्याला यमदूत घेऊन जातील, ही धास्ती तिला पडली. म्हणून ती आपल्या भावाला शिव्या देत त्याच्या घरी गेली, तिला वेड लागलं असावं, असा

तिच्या माहेरच्या माणसांचा समज झाला. पण आपल्या कृतीचा तिनं उलगडा करताच सर्वांनी तिचं कौतुक केलं. मग भावानं बहिणीला ओवाळणी घातली. तो दिवस होता कार्तिक शुद्ध द्वितीयेचा. त्या दिवसापासून भाऊबीजेचा सण सुरू झाला.

व्रजमंडलात या दिवशी मोठा उत्सव होतो. या दिवशी यमुनेत स्नान करणं पुण्यकारक मानतात. त्यानिमित्त तिथं लाखोंची यात्रा भरते. स्नानोत्सव हाच सर्वांत मोठा उत्सव तिथं मानला जातो. या दिवशी यमुनेबरोबर यमाचीही पूजा करतात.

## ३ हुमायुनाची मानलेली हिंदू बहीण

भावानं आपलं संरक्षण करावं म्हणून भावाच्या मनगटावर राखी बांधण्याची प्रथा ऐतिहासिक काळापासून रूढ आहे. मोगल राजवटीच्या काळातही अशी उदाहरणं आढळतात. हिंदू स्त्रियांवर त्या काळात संकटं ओढवत. तर त्या स्त्रियांना त्यांच्या हिंदुधर्मीय भावांकडून तर संरक्षण मिळेच; पण इतर धर्माच्या मानलेल्या भावांकडूनही अनेकदा त्यांना संरक्षण मिळाल्याची उदाहरणं आहेत. असं एक उदाहरण म्हणजे—

बहादुरशहानं चितोडवर स्वारी केली, तेव्हा महाराणा संग याची असहाय्य पत्नी कर्मवती हिनं हुमायुनाला राखी पाठवली. त्या गोष्टीची त्याला मोठी अपूर्वाई वाटली. तिच्या संरक्षणाचं ते राखीरूपी कंकण त्यानं आनंदानं आपल्या हाती बांधलं. आणि तिच्या मदतीला जायला तो सज्ज झाला. त्यावेळी तो बंगालच्या मोहिमेवर होता. तर ती मोहीम अर्धवट सोडून देऊन कर्मवतीच्या सहाय्यासाठी त्यानं चितोडगडाकडं धाव घेतली. पण तेवढं अंतर तोडायला त्याला थोडा विलंब लागला. आणि तो चितोडगडावर पोचेपर्यंत, गडावरच्या राजपूत स्त्रियांनी, शत्रूच्या हाती पडण्याचं संकट तोंडाशी आल्यानं त्याच्या तावडीतून सुटण्यासाठी दुर्दैवानं जोहार केला होता.

## ४ अमृतसर

पंजाबात अमृतसर हे शिखांचं पवित्र स्थान असून ते बियास नदीच्या तीरावर वसलं आहे, शिखांच्या एकूण चार 'तख्तां'पैकी अमृतसरचं तख्त हे *'श्रीअकाल तख्त साहबी' म्हणून ओळखलं जातं.*

या ठिकाणाचं मूळ नाव होतं चाक असं. शिखांचा चौथा गुरू रामदास यानं शिखांसाठी सुंदरसं मंदिर उभारण्याच्या हेतूनं प्रथम एक तलाव खोदला. त्याचं नाव ठेवलं अमृतसरोवर. या नावामागं एक आख्यायिका आहे, ती अशी—

रामचंद्रानं अश्वमेधानिमित्त दिग्विजयासाठी घोडा सोडला, तो वाल्मिकी आश्रमातल्या लव-कुशांनी पकडला. त्याला मुक्त करण्यासाठी राम-लक्ष्मण व भरत-शत्रुघ्न यांनी लव-कुशांशी युद्ध आरंभलं. पण त्या चौघांनाही कुमारांनी मूर्च्छित पाडलं. पुढं त्यांना शुद्धीवर आणण्याकरिता लव-कुश यांनी स्वर्गातून अमृत आणून ते त्यांच्यावर शिंपडलं. मग उरलेलं अमृत तिथंच जमिनीत पुरून टाकलं.

तर जिथं ते अमृत पुरलं होतं, त्याच जागी गुरू रामदास यांनी हा तलाव खोदला आहे, असं मानतात. ही भूमी रामदासाला अकबर-बादशहानं भेट म्हणून दिली होती. तिथं पर्णकुटी बांधून रामदासानं वसाहत सुरू केली. प्रथम रामदासपूर म्हणून ओळखलं गेलेलं हे ठिकाण पुढं तीर्थक्षेत्र बनलं. तलावातलं निर्मळ पाणी अमृतासारखं वाटल्यावरून रामदासपूरला पुढं अमृतसर म्हणू लागले. हे सरोवर ४७५ फूट लांब-रुंद असून त्याला चहूबाजूंनी संगमरवराचे घाट बांधलेले आहेत. तलावाच्या मध्यभागी सुवर्णमंदिर हे शिखांचं पवित्र स्थान आहे. ६५ फूट चौरस चौथऱ्याचं हे मंदिर शिखांचा पाचवा गुरू अर्जुनदेव यानं उभारलं. सरोवराच्या पश्चिम अंगाला दोनशे फूट लांबीचा संगमरवरी पूल आहे. त्यावरून मंदिरात जाता येतं. सुवर्णमंदिर हे खरंखुरं सोन्याचं मंदिर आहे. जगातल्या अद्भुत वास्तूंत याची गणना होते. महाराजा रणजितसिंह यानं या मंदिराचं सौंदर्य वाढवण्यासाठी अपार द्रव्य खर्च केलं. सोन्याचा मुलामा दिलेल्या पत्र्यांनी मंदिराची छतं व भिंती लख-

लखत असतात. याला हरमंदिर असं दुसरंही एक नाव आहे.

शीख लोक याला ‘ दरबार साहब’ म्हणतात; तर आपल्या पवित्र धर्मग्रंथाला ‘ ग्रंथसाहब ’ म्हणतात. पुलाच्या पश्चिम अंगाला, मुख्य मंदिराला जोडून ‘ अकालबुंग ’ नावाचं स्थान आहे. तिथं रात्रीच्या वेळी ग्रंथसाहब ठेवतात. रोज सकाळी तिथला ग्रंथसाहब नेऊन सुवर्णमंदिरातल्या एका छत्रीखाली ठेवतात. ग्रंथी म्हटला जाणारा अधिकारी दिवसभर त्यावर चवरी ढाळीत असतो. देवस्थानाचे गायक तिथं बसून ग्रंथसाहबातली गीतं रागदारीत गातात. त्याच्यासमोर एक वस्त्र पसरलेलं असतं. भाविक लोक त्यावर दक्षिणा ठेवतात. रात्र पडल्यावर ग्रंथसाहब पुन्हा अकालबुंगात नेऊन ठेवतात.

शिखांच्या गुरुद्वात कुणालाही उघड्या माथ्यानं जाता येत नाही. इथल्या एकूण तेरा गुरुद्वारांतला सुवर्णमंदिर हा प्रमुख.

अमृतसर, संतोषसर, रायसर, विवेकसर, व कमलसर अशी पाच तीर्थं इथं आहेत. दरसाल कार्तिक महिन्यात इथं भव्य जत्रा भरते.

अफगाण सेनापती अहमदशहा यानं १७६२ साली तोफा डागून हे पवित्र स्थान उद्ध्वस्त केलं होतं. पण जबर निष्ठेच्या शिखांनी त्यानंतर अवघ्या चार वर्षांत त्या मंदिराची नव्यानं उभारणी केली. शिवाय त्याच्याभोवती तटबंदीच्या इमारतीही बांधल्या.

## ५ पुष्करतीर्थ

राजस्थानात अजमेरजवळ पुष्करतीर्थ हे पुण्यक्षेत्र आहे. ब्रह्मदेवाचं क्षेत्र असं भारतात हे एकच एक असून याला ब्रह्मक्षेत्र म्हणतात. प्रयाग क्षेत्राला तीर्थराज म्हणतात, तसं याला पुष्करराज म्हणतात. याची गणना पंचतीर्थांत केलेली आहे. ती आख्यायिका अशी आहे—

एकदा ब्रह्मदेव भूलोकी भ्रमण करीत असताना त्याला एक निबिड अरण्य दिसलं. त्यानं त्याचं मन वेधल्यानं तो तिथं गेला. त्याच्या आगमनानं आनंदित होऊन तिथल्या वृक्षवल्लींनी त्याचं उत्साहानं

आतिथ्य केलं. त्यामुळं ब्रह्मदेव प्रसन्न झाला. 'या वनात तुम्ही कायमचे वास्तव्य करा' अशी विनंती त्यांनी ब्रह्मदेवाकडं केली. प्रसन्न झालेल्या विधात्यानं त्यांची इच्छा मान्य केली. अरण्यात येताना ब्रह्मदेवाच्या हाती तीन पुष्करं (कमळं) होती. ती तीन ठिकाणी पडली, तर त्यांची त्या-त्या ठिकाणी तीन सरोवरं निर्माण झाली. जेष्ठ, मध्यम व कनिष्ठ अशा नावांनी ती ओळखली जातात.

पुष्कर तीर्थाचं स्नान व ब्रह्मदेवाच्या मंदिरातील चतुर्मुख ब्रह्ममूर्तीचं दर्शन या गोष्टी या क्षेत्रात महत्त्वाच्या. मूर्तीच्या डाव्या-उजव्या अंगांना गायत्री व सावित्री आहेत.

कार्तिक महिन्यात पुष्करक्षेत्राची यात्रा केल्यास विशेष पुण्य लाभतं असं मानलं जातं. म्हणून या दिवसांत खूप यात्रेकरू तिथं जमतात. इथली प्राचीन मंदिरं औरंगजेब बादशहानं उद्ध्वस्त केली होती. पुढं राजस्थानातील राजांनी तिथं नव्यानं क्षेत्ररचना केली; व उजाड झालेल्या क्षेत्राला जिवंत कला आणली. इथं पशुहत्येला बंदी आहे.

## ६ साक्षी गोपालाची कथा

ओरिसा राज्यात पुरीजवळ साक्षीगोपाल नावाचं तीर्थक्षेत्र आहे. साक्षीगोपालाच्या मंदिराजवळ स्नानसंध्येसाठी चंदन तलाव असून एका बाजूला श्यामकुंड, तर दुसऱ्या बाजूला राधाकुंड अशी दोन सरोवरं आहेत. मंदिरातली गोपालकृष्णाची मूर्ती सुंदर आहे. जवळच राधेचंही मंदिर आहे. कार्तिक शुद्ध नवमीला इथं राधादर्शनाचा भव्य सोहळा साजरा होतो. या क्षेत्राबद्दलची कथा अशी आहे—

पुरीजवळच्या गावी एक म्हातारा ब्राह्मण होता. तो तीर्थयात्रेला निघाला, तेव्हा त्याच्या दिमतीला एक तरुण सोबत गेला. वाटेत त्या तरुणानं म्हाताऱ्याची सर्व प्रकारे सेवा केली. त्याच्या या सेवेमुळं म्हातारा त्याच्यावर अती संतुष्ट झाला. वृंदावन इथं ते पोचले, तसा

म्हातारा त्याला वचन देत म्हणाला: "बेटा, आपण परत घरी जाऊ, तेव्हा माझ्या मुलीशी लग्न करून देईन मी तुझं."

पण गंमत अशी, की सर्व यात्रा करून घरी परतल्यावर तो म्हातारा ब्राह्मण पूर्वी दिलेलं ते वचन पार विसरून गेला. म्हातारा श्रीमंत असल्यानं त्या गरीब तरुणाचं त्याला अगत्यच राहिलं नाही. पण म्हातारा वचन पाळण्याचं चिन्ह दिसेना, तेव्हा त्या तरुणानं आपलं गाऱ्हाणं पंचायतीकडं नेलं. "वचन दिलं त्याला कुणी साक्षी आहे का?" असा सवाल पंचांनी केला, तरुण बोलला, "गोपालकृष्णाच्या साक्षीनं यांनी वचन दिलं मला." पंचांनी विचारलं, "पण त्याला साक्षीला कसा काय आणशील तू?" तरुण आत्मविश्वासानं म्हणाला, "घेऊन येईन मी त्याला." कृष्णावर त्याची एवढी भक्ती व श्रद्धा होती, की आपल्या या अडचणीच्या वेळी गोपालकृष्ण खात्रीनं धावून येईल, असं त्याचं मन त्याला ग्वाही देऊ लागलं. आणि त्यानं गोपालकृष्णाची मनोभावे करुणा भाकली. कृष्ण प्रसन्न होऊन त्याला म्हणाला, "मी साक्षीला येतो. तू पुढं चालत राहा. मी पाठीमागून येईन. माझ्या पायातले नुपूर वाजलेले तुला ऐकू येतील, त्यावरून मी मागून येत असल्याचं तुला समजेल. तू मागं वळून मात्र बघायचं नाही, पाहिलंस, तर तिथल्या तिथं मी स्थिर होऊन राहीन."

गोपालकृष्णाची सूचना मानून तरुण चालत राहिला; तर मागून गोपालकृष्ण येत राहिला. अशा प्रवास चालला असताना फुलअलसा गावापाशी वाटेतल्या वाळूत पाय रुतल्यानं गोपालकृष्णाच्या पायांतल्या नुपूरांचा आवाज ऐकू येईनासा झाला. म्हणून तरुणानं न राहवून अचानक मागं वळून पाहिलं. अर्थात गोपालकृष्ण तिथंच स्थिर झाला. मूर्ती होऊन राहिला. पण गाव जवळच असल्यानं तरुण गावात धावत गेला आणि पंचांना घेऊन तिथवर आला. सगळी हकीगत सांगून गोपालकृष्ण तिथं कसा खडा होऊन ठाकला, ते तरुणानं त्यांना सांगितलं. तेव्हा पंचांची खातरजमा झाली आणि तरुणाला मुलगी द्यायला त्यांनी म्हाताऱ्या ब्राह्मणाला भाग पाडलं.

त्यानंतर कटकच्या राजानं गोपालकृष्णाची ही मूर्ती इथून नेऊन

पुरीच्या जगन्नाथ मंदिरात स्थापन केली. तर भाविक मंडळी जगन्नाथाकडं दुर्लक्ष करून, आणलेला नैवेद्य गोपालकृष्णाला सादर करू लागले. तेव्हा जगन्नाथानं आपल्या भक्तांना स्वप्नदृष्टांत दिला की, आपली उपासमार होतेय. तशी भक्तांनी दुसरं साक्षीगोपाल मंदिर उभारून गोपालकृष्णाची मूर्ती नेऊन तिथं स्थापली.

## ७ ब्रह्मराक्षस

एका नगरात द्रोण नावाचा एक ब्राह्मण राहत होता. तो दरिद्री असून दान आणि भिक्षेवर जगत होता. त्याने आपल्या आयुष्यात कधीही उत्तम वस्त्रें, सुगंधी उटणे, गंधमाला, अलंकार विडा वगैरेंचा उपभोग घेतला नव्हता. त्याची दाढी, मिशा, डोक्यावरचे केस आणि नखे नेहमी वाढलेली असत. थंडी, ऊन, वारा आणि पाऊस सहन करून त्याचे शरीर वाळून गेले होते. त्याची दया येऊन एका यजमानाने त्याला दोन वासरे दिली होती. लोकांकडून तेल, तूप, सातू वगैरे मागून आणून त्या दोन वासरांना चांगले वाढवले आणि ते चांगलें पुष्ट बैल झाले होते.

ही पुष्ट वासरे पाहून एक चोर मनात म्हणाला, 'मी या ब्राह्मणाची ही बैलांची जोडी चोरून नेईन.' असे ठरवून रात्री हातात दोन दावी घेऊन तो ब्राह्मणाच्या घराकडें निघाला. तेव्हा अर्ध्या रस्त्यातच त्याला एक भयंकर राक्षस दिसला. त्याचे दात वाकडेतिकडे व तीक्ष्ण होते. नाक लांब होते. डोळे रक्तासारखे लाल होते. अंगावरच्या शिरा स्पष्ट दिसत होत्या. त्याचे गाल खप्पड होते आणि त्याच्या दाढी-मिशा अग्निज्वालेप्रमाणे तांबड्या होत्या. अशा त्या राक्षसाला पाहून तो चोर भयंकर घाबरला! तरीही त्याने विचारले, "तू कोण आहेस?"

"मी सत्यवचन नावाचा ब्रह्मराक्षस आहे. आता तू तुझी ओळख सांग." तो म्हणाला.

"मी क्रूरकर्मा नावाचा चोर आहे. दरिद्री ब्राह्मणाची बैलजोडी चोरायला मी जात आहे."

"भल्या माणसा, मी सहा दिवसांनी एकदा जेवतो. आज त्या ब्राह्मणाला खाणार आहे. तुझे आणि माझे काम एकाच ठिकाणी आहे, हे उत्तमच झाले की."

ते दोघे ब्राह्मणाच्या घरी गेले आणि योग्य वेळेची वाट पाहत एकांतात थांबले. ब्राह्मण झोपल्यावर राक्षस त्याला खाण्यासाठी निघालेला पाहून चोर म्हणाला, "हा काय न्याय झाला ? मला आधी चोरू दे. नंतर तू या ब्राह्मणाला खा."

तो म्हणाला, "ब्राह्मण बैलांच्या ओरडण्याने जागा होईल आणि माझे येथे येणे फुकट जाईल."

चोर म्हणाला, "तू ब्राह्मणाला खायला सुरुवात केलीस आणि मध्येच काही विघ्न उपस्थित झाले, तर मला बैल नेता येणार नाहीत. म्हणून मी प्रथम बैल चोरतो. त्यानंतरच तू ब्राह्मणाला खाल्ले पाहिजेस." अशा तऱ्हेने ते दोघे 'तू आधी की मी आधी' याबद्दल कडाक्याचा वाद करू लागले. त्यांच्या आरडाओरडीमुळे ब्राह्मण जागा झाला.

तेव्हा त्याला चोर म्हणाला, "अरे ब्राह्मणा, हा राक्षस तुला खाण्याची इच्छा करीत आहे !"

राक्षस म्हणाला, "अरे ब्राह्मणा, हा चोर तुझी बैलजोडी चोरायला आला आहे !"

दोघांचे बोलणे ऐकून ब्राह्मण सावध झाला आणि इष्टदेवतांचा मंत्र जपून आणि ध्यान करून त्याने राक्षसापासून आपला प्राण वाचवला आणि चोराला काठीचे तडाखे मारून आपल्या बैलजोडीचे रक्षण केले.

□



## ८ बिनतोड साक्ष

तुर्कस्तानातली बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट. तिथल्या एका ख्रिश्चन माणसाची गाय हरवली. कुठंही शोधून सापडेना. अखेर निराश होऊन तो घराकडं परतला. तर आपली गाय शेजाऱ्याच्या पडवीत बांधून ठेवलेली त्याच्या नजरेस पडली. त्या शेजाऱ्याकडं जाऊन त्यानं आपली गाय मागितली, पण ती आपलीच आहे, असं बेधडक सांगून शेजारी त्याला दाद देईना.

अखेर ख्रिस्ती माणसानं काजीकडं फिर्याद नेली. काजी म्हणाला, "ती गाय तुझीच आहे, याची खात्री पटवण्यासाठी तू दोन साक्षीदार आण."

ख्रिस्ती माणसानं आपले दुसरे दोन शेजारी साक्षीला आणले. त्यांनी ती गाय ख्रिस्ती माणसाची असल्याबद्दल शपथेवर साक्ष दिली, पण ते दोघेंही साक्षीदार ख्रिश्चन म्हणून त्यांचं म्हणणं काजीनं मानलं नाही. त्यानं मुसलमान साक्षीदार आणायला सांगितलं. मुसलमान शेजारी होते; पण त्यांच्यापैकी कुणीही साक्ष द्यायला तयार होईना. तेव्हा तो ख्रिस्ती माणूस हताश झाला, पण मग एकाएकी त्याला एक कल्पना सुचली. त्याबरोबर तो तडक काजीकडं गेला आणि म्हणाला, "तुम्हाला ख्रिस्ती साक्षीदार चालत नाहीत, तर मला मुसलमान साक्षीदार मिळत नाही. तरीपण माझ्यापाशी असा एक साक्षीदार आहे की, जो ख्रिस्ती नाही की मुसलमान नाही."

"असा आहे तरी कोण तो ?" काजीनं विचारलं.

"माझ्या गाईचं वासरू माझ्यापाशी आहे. ते मी त्या गाईकडं सोडून देतो. ते गाईकडं धावत गेलं आणि गाईनं त्याला चाटून आपलं दूध चोखू दिलं, तर मग तरी ती गाय माझीच असल्याचं तुम्ही कबूल कराल ना ?"

ही साक्ष बिनतोड असल्यानं काजीला नाकारता येईना. शेवटी त्या साक्षीच्या पुराव्यावर ती गाय त्या ख्रिस्ती माणसाचीच आहे असा निर्णय त्याला द्यावा लागला.

## ९ सुटका

एका वनामध्ये चंडकर्मा नावाचा राक्षस राहत होता. तो एकदा वनात फिरत असता त्याला एक ब्राह्मण भेटला. राक्षस त्याच्या खांद्या-वर बसला आणि त्याला म्हणाला, " चल आता पुढे. "

ब्राह्मण फार घाबरला आणि त्याला घेऊन पुढे चालू लागला. राक्षसाचे पाय कमळाच्या अंतर्भागासारखे कोमल व मऊ असलेले पाहून त्याने राक्षसाला विचारले, " तुझे पाय इतके कोमल आणि मऊ कसे आहेत ? "

" अरे, मी जमिनीला पाय न लावण्याचे व्रत घेतले आहे. "

त्यापुढे ब्राह्मण आपल्या सुटकेचा विचार करू लागला. लौकरच तो एका सरोवराजवळ पोहोचला. तेव्हा राक्षस म्हणाला, " मी स्नान आणि देवपूजा करून परत येतो, तोपर्यंत हे ठिकाण सोडून तू दुसरीकडे जाऊ नकोस. "

तेव्हा ब्राह्मणाने मनात विचार केला, " देवपूजा संपल्यावर हा नक्कीच मला खाईल. तेव्हा मी ताबडतोब पळून जातो. पाय ओले असल्यामुळे तो माझ्यामागें माझा पाठलाग बहुधा करणार नाही.

याप्रमाणे ब्राह्मण पळून गेल्यावर व्रतभंग होण्याच्या भीतीने राक्षसाने त्याचा पाठलाग केला नाही.

## १० गिरनार कथा

सौराष्ट्रातील गिरनार पर्वतशिखर हे एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. गिरनारची पुराणकथा अशी आहे–

एकदा ब्रह्मदेव इतर देवांसह कैलासावर गेला. त्यावेळी विष्णूनं शिवाकडं तक्रार केली : " तू दैत्यांवर कृपा करतोस हे काही बरे नव्हे.' त्यावर शिव उत्तरला : " बोलून चालून मी आशुतोष आहे. कोणत्याही निष्ठावान भक्तावर मी प्रसन्न होतो. तो भक्त देव आहे की दैत्य हे मी

पाहत नाही. माझं हे कृत्य तुम्हाला योग्य वाटत नसेल, तर मी इथून निघून जातो."

आणि रागाच्या भरात शिव तडक निघाला, तो थेट गिरनार पर्वतावर जाऊन ठेपला. पार्वती व देव चिंतेत पडले. ती सर्वमंडळी त्याचा शोध घेत गिरनार पर्वतावर आली. तिथं शिव आपली वस्त्रं उतरून ठेवून गुप्तपणे राहत होता. शिवाला प्रसन्न करू घेण्यासाठी पार्वतीनं शिवाच्या भक्तीपर गीत आळवलं. ते ऐकून शिवानं तिला दर्शन दिलं. 'आपण पुन्हा कैलासावर जाऊ या,' असा आग्रह पार्वतीनं धरला. 'बाकीचे देव इथं वास्तव्य करीत असतील, तर मी कैलासाला परतेन,' अशी अट शिवानं घातली. त्यावर तोडगा म्हणून पार्वतीसह सर्व देव अंशरूपानं गिरनारवर वास करू लागले. मग शिव-पार्वती मूळ रूपात कैलासावर परतली. गिरनार पर्वताच्या एका शिखरावर विष्णू, तर दुसऱ्यावर अंबारूपात पार्वती राहिली. इथं शिवानं आपली वस्त्रं उतरून ठेवली होती, त्यावरून या स्थानाला वस्त्रापथ क्षेत्र म्हटलं जाऊ लागलं.

कार्तिक शुद्ध एकादशीला इथल्या भवनाथाच्या मंदिरापासून यात्रा निघते, ती पौर्णिमेला गिरनारची परिक्रमा पुरी करते.

## ११ पुंडलिक

भगवान विष्णू पांडुरंगाचा अवतार घेऊन पंढरपुरी कसा आला, त्याविषयीची कथा अशी आहे–

पंढरपुरात भीमा नदीच्या तीरावर जानुदेव नावाचा ब्राह्मण राहत होता. त्याची बायको होती सत्या नावाची. तिला मुलगा झाला, त्याचं नाव ठेवलं पुंडलिक. तो मोठा झाल्यावर एका रूपवान मुलीशी त्याचं लग्न करून देण्यात आलं. पण लग्न झाल्यावर तो बाईलवेडा झाला. तो तिच्या नादी एवढा लागला, की स्वतःच्या आईबापांची पर्वा

करीनासा झाला, त्यांना कस्पटासमान वागवू लागला. त्यामुळं त्यांना हालअपेष्टात दिवस काढावे लागू लागले. अखेर या दुर्दशेला कंटाळून ती दोघं काशीयात्रेला निघून गेली.

काही दिवस संसारात रमल्यानंतर पुंडलिक भानावर आला. त्याला आपल्या आईबापांची आठवण झाली, आणि तो स्वतः काशीला निघाला. जाता-जाता वाटेत कुक्कुट ऋषीचा आश्रम लागला. तिथं तो थोडे दिवस राहिला. तर ऋषी आपल्या मातापित्याची जिवाभावानं सेवा करीत असल्याचं त्याला आढळून आलं. या सेवेमुळं लाभलेल्या पुण्याईचा चमत्कार असा, की त्याला स्नान घालण्यासाठी गंगा, यमुना व सरस्वती या नद्या भल्या पहाटे त्याच्या आश्रमाशी येत. या गोष्टीचं नवल करीत पुंडलिकानं ऋषीला त्याबद्दल विचारलं. हे सारं माता-पित्यांची सेवा करीत असल्याचं फळ असल्याचं सांगून ऋषीनं त्याला पुत्रधर्म पाळण्याचा उपदेश केला. त्या उपदेशामुळं पुंडलिकाला आई-बापांच्या सेवेची मातब्बरी कळली. तो तातडीनं काशीला गेला आणि आपल्या आईबापांना प्रेमभरानं भेटला. मग त्यानं त्यांची काशीयात्रा यथासांग पुरी केली आणि त्यांना आदरानं घरी नेलं. घरी परतल्यावर तो आस्थेनं त्यांची सर्वतोपरी सेवा करीत राहिला.

पुंडलिकाच्या या सेवेवर भगवान विष्णू संतुष्ट झाला. त्याला भेटायला स्वतः त्याच्याकडं गेला. त्यावेळी पुंडलिक आईबापांची सेवा करण्यात मग्न होता. म्हणून त्यानं विष्णूला थांबायला सांगितलं व उभं राहण्यासाठी त्याच्याकडं जवळची एक वीट फेकली. कटीवर हात ठेवून विष्णू त्या विटेवर वाट बघत उभा राहिला. आईबापांवरची त्याची अलोट भक्ती पाहून विष्णू त्याच्यावर प्रसन्न झाला. त्यानं पुंडलिकाला वर मागायला सांगितलं. पुंडलिक बोलला : "भगवंता, या– अशाच रूपात तू चिरंतन इथंच राहावंस. पुंडलिकवरद म्हणून इथं तुझी ख्याती व्हावी आणि हे क्षेत्र पुंडलिकपूर म्हणून ओळखलं जावं." विटेवरच्या विष्णूनं 'तथास्तु' म्हणून त्याच्या म्हणण्याला मान्यता दिली.

विटेवर उभ्या ठाकलेल्या विष्णूच्या या स्वरूपाला विठ्ठल म्हटलं जाऊ लागलं. भागवतधर्माचे अनुयायी गेली कित्येक शतकं या विठ्ठलाला

आपलं उपास्यदैवत मानून राहिले आहेत. पुंडलिकपुराचं पुढं पंढरपूर असं नाव रूढ झालं आणि पंढरपूरचा विठ्ठल 'पांडुरंग' या नावानंही ओळखला जाऊ लागला.

पंढरपुरात विठ्ठलाच्या देवळापासून पंधराशे फूट अंतरावर, चंद्रभागा नदीच्या वाळवंटात पुंडलिकाचं देऊळ असून ती पुंडलिकाची समाधी मानली जाते. पुंडलिकाचं प्रतीक म्हणून या मंदिरात शिवलिंग आहे. प्रथेनुसार आधी पुंडलिकाचं दर्शन घेतल्याखेरीज पांडुरंगाचं दर्शन भक्त-भाविक घेत नाहीत.

## १२ तुलसीविवाह कथा

विष्णूचा तुलसीशी विवाह लावण्याचा पूजोत्सव कार्तिकी द्वादशीपासून पौर्णिमेपर्यंत कोणत्याही एखाद्या दिवशी संध्याकाळी करतात, पण मुख्यतः द्वादशीला करतात.

कांची नगरीत कनक नावाचा एक क्षत्रिय होता. त्याला नवसानं एक मुलगी झाली. तिचं त्यानं नाव ठेवलं किशोरी. तिची पत्रिका पाहून एका ज्योतिषानं सांगितलं, की– जो तिचं पाणिग्रहण करील तो अंगावर वीज पडून मरेल.

पुढं एका ब्राह्मणानं किशोरीला द्वादशाक्षरी विष्णुमंत्र सांगितला. त्या मंत्राचा जप करावा, तुलसीची रोपं लावून त्यांची जोपासना करावी आणि कार्तिक शुद्ध नवमीला विष्णूशी तुलसीचा विवाह लावावा, असं व्रतही त्यानं तिला सांगितलं. ती त्याप्रमाणं करू लागली.

तारुण्याबरोबर किशोरीचं सौंदर्य वाढत गेलं. एकदा एका गंध्यानं तिला पाहिलं व तो तिच्यावर मोहित झाला. तिचा लाभ करून घेण्यासाठी एका माळणीची मदत त्यानं घेतली. माळणीनं त्याला स्त्रीवेष देऊन किशोरीकडं नेलं. किशोरीला ती म्हणाली : "ही माझी मुलगी फुलांची रचना करण्यात तरबेज आहे. तर हिला तू तुझ्याकडं ठेवून घे. ती तुला देवासाठी फुलांच्या नाना प्रकारच्या रचना करून देत जाईल."

किशोरीला काही शंका आली नाही. तिनं स्त्रीवेषातील त्या गंध्याला दासी म्हणून ठेवून घेतलं.

त्याच सुमारास कांची राजाचा पुत्र मुकुंद हा किशोरीला पाहून तिच्यावर भाळला. तिच्याशी लग्न करायचं त्यानं मनाशी ठरवलं. तो सूर्याची उपासना करायचा. तर सूर्यानं स्वप्नात दृष्टान्त देऊन त्याला सांगितलं– "किशोरीचा नाद तू सोडून दे. तिचं पाणिग्रहण करणारा वीज पडून मरेल, असं भविष्य आहे." पण मुकुंद आपला हट्ट सोडीना. तो सूर्याला साकडं घालीत म्हणाला : "तुझ्यासारख्या समर्थ देवाला तिचं वैधव्य टाळता येईल. मी निक्षून सांगतो की, किशोरी मला लाभली नाही, तर मी अन्नपाणी वर्ज्य करून मरून जाईन."

तेव्हा सूर्यानं नाइलाजानं किशोरीच्या बापाला दृष्टान्त देऊन सांगितलं की, राजपुत्र मुकुंदाला तू आपली मुलगी दे."

दुसऱ्याच दिवशी राजाच्या मंत्र्यानं कनकाकडं येऊन राजपुत्रासाठी किशोरीस मागणी घातली. अर्थात कनकाला ती मान्य करणं भाग पडलं. मग कार्तिकी द्वादशी ही लग्नतिथी ठरवण्यात आली.



लग्नाचा मुहूर्त जवळ आला. किशोरी विष्णू व तुलसी यांचं ध्यान करण्यात मग्न होती. किशोरीचं आता राजपुत्राशी लग्न होणार, आता ती आपल्या हाती लागणार नाही, या खात्रीनं गंध्री मनातून चडफडला. किशोरी लग्नमंडपात जाण्याआधी तिचा एकदा तरी हात धरायचा, असं त्यानं मनाशी योजलं. त्यासाठी तो टपून बसला. अशा-वेळी एकाएकी मेघगर्जनेसह विजा कडाडल्या. लग्नासाठी जमलेली मंडळी भयचकित होऊन गेली. किशोरीही भांबावून खोलीबाहेर आली. ती संधी साधून गंध्यानं पुढं सरसावून किशोरीचा हात धरला. पण नवल असं घडलं की, त्याच क्षणी गंध्याच्या डोक्यावर वीज कोसळली, व तो तत्काल मरण पावला.

किशोरीचं अशुभ भविष्य अशारीतीनं खरं ठरलं. नंतर वादळ शमताच राजपुत्र मुकुंद याच्याशी तिचं लग्न थाटामाटानं झालं. अशा प्रकारं तुलसीव्रताच्या प्रभावानं किशोरीचं वैधव्य टळलं.

## १३ दैव

एका नगरात देवशक्ती नावाचा राजा होता. त्या राजाच्या मुलाच्या पोटात एक नाग राहात होता. त्यामुळे तो राजपुत्र दिवसें-दिवस अशक्त होऊ लागला. अनेक चांगल्या चांगल्या वैद्यांनी शास्त्रा-प्रमाणे औषधे तयार करून त्याचेवर खूप उपचार केले, पण कशाचाही उपयोग झाला नाही, म्हणून तो राजपुत्र वैतागून दुसऱ्या देशात गेला. तेथे एका मोठ्या मंदिरात तो राहात असे आणि गावात भिक्षा मागून कसा तरी काळ कंठत असे.

त्या नगरात बली नावाचा राजा होता. त्याला दोन तरुण मुली होत्या. प्रत्येक दिवशी सूर्योदयाच्या वेळी त्या आपल्या पित्याकडे येऊन नमस्कार करीत. एके दिवशी त्यांतील एक म्हणाली, "महाराजांचा विजय असो ! त्यांच्या प्रसादामुळेच सर्वांना सुख मिळते."

दुसरी मुलगी म्हणाली, "महाराज, प्रत्येकाला त्याच्या दैवा-

प्रमाणेच मिळत असते."

दुसऱ्या मुलीचे बोलणे ऐकून राजाला राग आला आणि तो म्हणाला, "अरे मंत्र्यांनो, कटू बोलणाऱ्या या कुमारिकेला एखाद्या परदेशी व्यक्तीला देऊन टाका. म्हणजे तिच्या दैवात असलेले तिला उपभोगता येईल."

"आज्ञा प्रमाण !" असे म्हणून मंत्र्याने एक-दोन सेवक बरोबर घेऊन तिचा विवाह मंदिरात राहणाऱ्या त्या राजपुत्राबरोबर करून दिला. राजकन्येनेही संतुष्ट मनाने त्या पतीचा नियमाप्रमाणे स्वीकार केला आणि ती त्याला घेऊन दुसऱ्या देशात निघून गेली.

एका खूप दूरच्या नगराजवळ ती दोघे पोचली. तेथील जवळच्या तलावाकाठी ते थांबले. तिने पतीला राखणीसाठी तेथेच ठेवले आणि ती सेवकांसह तेल, तूप, तांदूळ वगैरे खरेदी करण्यासाठी गेली. ती परत आली तेव्हा राजपुत्र नागाच्या वारुळावर डोके ठेवून झोपलेला तिला दिसला. त्याच्या तोंडातून एक नाग बाहेर आला आणि त्यानेही फणा काढली.

एकमेकांना पाहून त्या दोन्ही नागांचे डोळे रागाने लाल झाले. त्यांपैकी वारुळातील नाग म्हणाला, "अरे दुष्टा, या सर्वांगसुंदर राजकुमाराला अशा प्रकारे तू का त्रास देत आहेस ?"

राजपुत्राच्या तोंडातील नाग म्हणाला, "अरे दुष्टा, तूही या वारुळातील सोन्याने भरलेल्या दोन रांजणांवर बसून त्यांना का दूषित करीत आहेस ?"

याप्रमाणे ते दोघे एकमेकांची रहस्ये उघडी करीत होते.

पुन्हा वारुळातील नाग म्हणाला, "दुरात्मा, तुला बाहेर काढायचे औषध कोणाला माहीत नाही असे तुला वाटते काय ? जुन्या काळच्या मिऱ्याचे पाणी करून या राजपुत्राला पाजले, तर तुझा नाश ठरलेलाच !"

राजपुत्राच्या पोटातील नाग म्हणाला, "तुझ्यावरचे औषधही कुणाला माहीत नाही असे समजू नकोस ! तुझ्या बिळात तापलेले तेल किंवा उकळते पाणी टाकले तर तुझा नाश ठरलेलाच आहे !"

झाडाच्या फांदीमागें लपलेल्या राजकन्येने त्यांचे हे संभाषण आणि रहस्य ऐकले आणि त्यांनी सुचविल्याप्रमाणेच तिने सर्व केले. आपल्या पतिराजाला निरोगी बनवले आणि वारुळातील धन मिळवून ती आपल्या पित्याकडे परत आली. तिच्या आईबापांनी तिचे कौतुक केले आणि ती तेथे सुखाने राहू लागली.

## १४ वैकुंठचतुर्दशी

**कार्तिक शु.** १४ : या तिथीला वैकुंठचतुर्दशी म्हणतात. हरिहरांच्या भेटीचा दिवस म्हणून हे दोघांचं संयुक्त व्रत मानतात. प्रथम विष्णूची व मग शंकराची पूजा करतात. पूजा आटोपल्यावर प्रत्येक देवाला नाममंत्रानं सहस्र कमळं वाहायची असतात. या व्रताची कथा आहे, ती अशी–

कृतयुगात या तिथीला भगवान विष्णू वैकुंठाहून वाराणशीला आला. रात्रीच्या चौथ्या प्रहरी त्यानं मणिकर्णिका तीर्थात स्नान केलं आणि सहस्र कमळं जमवून शंकराची पूजा आरंभली. त्याच्या भक्तीची कसोटी पाहण्यासाठी शंकरानं त्यांतलं एक कमळ लपवलं. एक कमळ कमी पडल्याचं विष्णूच्या लक्षात आलं. उठून कमळ आणायला जावं, तर चालू पूजा भंग होणार होती. म्हणून विष्णूनं ऐनवेळी स्वतःचं एक नेत्रकमळ काढून वाहिलं आणि संकल्प पुरा केला. हा प्रकार पाहून शंकर प्रसन्न झाला. विष्णूला त्रैलोक्याचं राज्य बहाल करून तो त्याला म्हणाला : 'आणखी हवा तो वर माग.' त्यावर विष्णूनं अशी इच्छा व्यक्त केली, की–' माझ्या हातून दैत्यांचा नाश व्हावा.' त्याची इच्छा पुरी व्हावी म्हणून शंकरानं त्याला सुदर्शन चक्र दिलं.

तेव्हापासून या तिथीला वैकुंठ (विष्णू) चतुर्दशी म्हणण्यात येऊ लागलं.

## १५ त्रिपुरी पौर्णिमा

**कार्तिक शु. १५ :** त्रिपुरी पौर्णिमा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या तिथीला घरात, घराबाहेर, त्याचप्रमाणं देवळातही दिव्यांची आरास करतात. या दिवशी नदीच्या पाण्यात दिवे सोडून दीपदान करणं, गंगा-स्नान करणं व कार्तिकस्वामीचं दर्शन घेणं, असा विधी सांगितला आहे. देवस्थानातील दगडी दीपमाळाही पाजळतात. या दीपोत्सवाला 'त्रिपुर पाजळणं' असं म्हणतात. त्रिपुरी पौर्णिमेची कथा अशी आहे–

त्रिपुर नावाच्या असुरानं खडतर तप करून ब्रह्मदेवाकडून वर मागून घेतला, की–'मला अभय असावं (शत्रूपासून भय नसावं).' या वरामुळं त्रिपुरासुर उन्मत्त झाला आणि सर्व लोकांना– देवादिकांनाही त्रास देऊ लागला. त्याची तीन पुरं (नगरं) होती. त्यांना त्यानं अभेद्य तटबंदी करून घेतली होती. त्यामुळं देवांनाही त्याचं पारिपत्य करता येईना. अखेर त्रिपुरासुराचा पाडाव करण्यासाठी देवांनी शंकराची प्रार्थना केली. तेव्हा शंकरानं त्याची तिन्ही नगरं जाळून टाकून त्याला ठार मारलं. कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी ही घटना घडली, म्हणून तिला 'त्रिपुरी' असं म्हटलं जाऊ लागलं. त्रिपुरासुराच्या वधाचा आनंद दीपोत्सव करून सर्वत्र साजरा करण्यात आला.

त्रिपुरीबद्दलची दुसरी अशीही एक कथा आहे–

मयासुरानं ब्रह्मदेवाची भक्ती करून त्याला प्रसन्न करून घेतलं. त्यामुळं त्याची भरभराट झाली. त्याची त्रिपुरं (तीन नगरं) होती, ती त्यानं भक्कम तटबंदी करून अभेद्य बनवली होती. ब्रह्मदेवाच्या कृपेनं त्याची भरभराट झाली. तो देवांच्या वाटेला कधी गेला नाही. त्याचा मुलगा तारकासुर हाही त्याच्यासारखाच वागला व त्याचीही भरभराट झाली. पण त्याचे तीन मुलगे– ताराक्ष, कमलाक्ष व विद्युन्माली हे मात्र विपरीत बुद्धीनं वागू लागले. देवांना त्रास देऊ लागले. तेव्हा त्यांच्या मदतीस शंकर धावून आला. त्यानं त्यांची तिन्ही पुरं जाळून टाकून त्यांचा नाश केला.

शंकराचा पुत्र स्कंद याचा जन्म या दिवशी झाला, म्हणून उत्तर

प्रदेशात हा दिवस स्कंदजयन्ती म्हणून मानण्यात येतो. या दिवशी स्कंदाच्या मूर्तीची पूजा करतात. दक्षिण भारतात हा दिवस कृत्तिका-महोत्सव म्हणून साजरा करतात. त्यात शंकराची पूजा करतात. एका उच्च स्तंभावर अग्नी प्रज्वलित करतात.

## १६ गुरूनानक

शीखांचा आद्य गुरू नानक याचा जन्म पंजाबातील तळवंडी गावी कार्तिक पौर्णिमेला झाला, असं शीख लोक मानतात. हे साल होतं १४६९. हल्ली हे गाव 'नानकानासाहेब' या नावानं ओळखलं जातं. हिंदुस्थानची फाळणी झाल्यानंतर या गावाचा समावेश पाकिस्तानात झाला आहे.

प्रभू रामचंद्राचा पुत्र लव हा नानकाच्या घराण्याचा पूर्वज मानला जातो. नानकाला लहानपणापासूनच देवभक्तीची आवड निर्माण झाली. एकदा वडिलांनी त्याला वीस रुपये देऊन व्यापार करायला बाहेरगावी पाठवलं. तर वाटेत भेटलेल्या उपाशी फकिरांना त्यानं ते पैसे खुशाल देऊन टाकले. तो आपला ईश्वराच्या चिंतनात आपला वेळ घालवायचा. लहर लागली, तर जेवायचा; नाहीतर नाही. त्याची एकूण वागणूकच लोकविलक्षण होती. त्याचं आध्यात्मिक ज्ञान पाहून लोक थक्क होऊ लागले. तो अवतारी पुरुष आहे, असं मानू लागले. त्याच्याबद्दल दंत-कथाही पसरू लागल्या—

(१) एकदा रानात गाई चारताना नानक एका झाडाखाली झोपला होता. तर त्याला उन्हाचा ताप होऊ नये म्हणून एक नाग त्याच्या माथ्यावर फणा उभारून त्याला सावली देत राहिला होता.

(२) नानक जहागीरदाराची शेतं राखायचा. तर तो ध्यानात मग्न राहतो व त्यामुळं शेतातलं पीक गुरं खाऊन टाकतात, अशा तक्रारी कुणी-कुणी जहागीरदाराकडं केल्या. म्हणून एकदा खुद्द जहागीरदार शेतांची स्थिती कशी काय आहे ते पाहायला गेला. तर तिथली पिकं



उलट इतरांच्या पिकांहून भरदार वाढलेली त्याला आढळली. हा अजब प्रकार नजरेस पडताच, नानक अलौकिक पुरुष आहे, असं तो मानू लागला.

पुढं १४८८ साली त्याचं लग्न करून देण्यात आलं. त्याला एक-दोन मुलंही झाली, पण संसारात त्याचं लक्ष नव्हतं. साधुसंतांच्या संगतीत राहायचं व गोरगरिबांना उदारपणे मदत करायची, असं त्याचं चाले. त्यामुळं घरात आर्थिक ओढाताण होऊ लागली. अखेर संसाराला विटून त्यानं घर सोडून चक्क फकिरी पत्करली. एकांतात चिंतन करून तो राहू लागला. "हिंदु-मुसलमान हा भेद व्यर्थ आहे. सर्व माणसं परमेश्वराची लेकरं आहेत," असं तो म्हणायचा.

मग १४९९ ते १५०९ या काळात त्यानं भारतभर तीर्थयात्रा केली. त्याच काळात त्यानं आपला नवा धर्मपंथ स्थापला. हळूहळू त्याला शिष्य मिळू लागले. एकदा नानक मर्दाना या मूळच्या मुसलमान शिष्यासह दिल्लीला गेला. तिथला त्यावेळचा सुलतान सिकंदर लोदी हा संत वा फकिरांना तुच्छ लेखी. त्यानं या दोघांना बेधडक तुरुंगात डांबलं. त्यांच्यावर व इतर कैद्यांवर दळणाच्या कामाची सक्ती करण्यात आली.

पण नानकानं स्वत: तर जात्याला हात लावला नाहीच, पण इतर कैद्यांनाही दळण करू नका म्हणून सांगितलं. मग नानकानं मर्दानाला आपलं एक गीत गायला लावलं. नवल असं, की ते गाणं सुरू होताच एकजात सर्व जाती घरघरू लागली. दळण आपोआप होऊ लागलं. ही अजब गोष्ट कळल्याबरोबर सुलतान तुरुंगाकडं धावताच गेला. तो चमत्कार पाहताक्षणी त्यानं सरळ नानकाची क्षमा मागितली. त्याला व त्याच्या शिष्याला तर सुलतानानं लगेच सोडून दिलंच. शिवाय नानकाच्या सांगण्यावरून बाकीच्या कैद्यांचीही सुटका केली.

आता नानकाचा नावलौकिक खूपच वाढला. १५२० साली मर्दाना याच्यासह नानक मक्केच्या यात्रेला गेला, तो पंथाचा प्रचार करीत-करीत १५२३ साली भारतात परतला. त्यानंतर वर्षभर पंजाबात प्रचारयात्रा काढून शेवटी तो करतारपूर इथं स्थायिक झाला. बायको-मुलांसह राहून गृहस्थ धर्माचं आचरण केलं. आता त्याचा दृष्टिकोन व्यापक बनला होता. प्रपंच साधून परमार्थही केला. त्याचा शिष्यवर्ग आता खूप वाढला होता. आयुष्याच्या अखेरीला हिंदु-मुसलमान असे कित्येक शिष्य त्याची सेवा करीत होते. नानक आता त्यांच्या शीख संप्रदायाचे गुरू बनले होते. सर्व शिष्य एकमेकांना भाई-भाई मानीत. नानकांनी सुरू केलेल्या अन्नछत्रात एकत्र बसून भोजन करीत. शेतीही सहकारी पद्धतीनं करीत.

आपला संप्रदाय आपल्या मागून वाढत राहावा या हेतूनं नानकांनी आपलं आध्यात्मिक पीठ स्थापलं. मात्र दोघेही मुलगे कर्तबगार असतानाही त्यांच्यापैकी एकालाही त्यांनी आपला वारस म्हणून नेमले नाही. तर लहना नावाच्या शिष्याला त्यांनी आपला धार्मिक वारस ठरवले. अंगद असं त्याचं नवं नामकरण करून त्याला त्यांनी आपल्या गादीवर बसवलं. एवढंच नव्हे, तर गुरू म्हणून स्वत: त्याला वंदन केलं.

नानक मरायला टेकले, तेव्हा मृत्यूनंतर त्यांच्या पार्थिव देहाचं दहन करायचं की दफन असा वाद शिष्यवर्गात उद्‌भवला. तेव्हा नानक म्हणाले : "हिंदू व मुसलमान अशा दोन्ही धर्मीयांनी माझ्या शवावर वेगवेगळी फुलं वाहावीत. चोवीस तास झाल्यावर ज्यांची फुलं ताजी राहिल्याचं आढळून येईल, त्यांनी आपल्या धर्मानुसार माझी उत्तरक्रिया

करावी."

अखेर १५३८ साली (आषाढ शुद्ध दशमीला) नानकांचं देहावसान झालं. त्यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांच्या हिंदु-मुसलमान अनुयायांनी त्यांच्या शवावर फुलं वाहिली. पण नवल असं घडलं, की ती सगळीच फुलं ताजी राहिलेली दिसली. आणि खुद्द नानकांचा देह मात्र अदृश्य झालेला आढळला. मग फुलांखालच्या वस्त्राचे दोन भाग करण्यात आले. हिंदू अनुयायांनी एका भागाचं दहन केलं, तर दुसऱ्या भागाचं दफन करून मुसलमान अनुयायांनी त्यावर कबर बांधली. कालांतरानं रावी नदीच्या प्रवाहानं ती कबरही पार धुऊन नेली.

पुरोगामी वृत्तीमुळं थोर संत म्हणून गुरुनानकांना कीर्ती लाभली.

## १७ पंजासाहिबाची कथा

पंजासाहिब नावाचं शिखांचं पंजाबात एक पुण्यक्षेत्र आहे. तिथं असलेल्या मंदिरापाशी एक तलाव आहे. या पंजासाहिबाची कथा सांगितली जाते, ती अशी–

एकदा शिखांचे आद्य गुरू नानक रावळपिंडीजवळच्या हसन अब्दाल या गावी गेले होते. जवळच एक टेकडी होती. तिच्यावर बाबा वली कंदहारी नावाचा मुसलमान साधू राहत होता. त्या टेकडीवर एक झरा होता. त्याचं पाणी आणायला गुरू नानक यांनी आपल्या एका शिष्याला पाठवलं. तर त्या मुसलमान साधूचे चेले त्याला पाणी घेऊ देईनात. हे पाहताच गुरू नानकांनी आपल्या दैवी शक्तीनं तिथला तो झरा बंद पाडला आणि आपल्या मुक्कामाच्या ठिकाणी आणला. त्याबरोबर हा प्रकार बघून त्या मुसलमान साधूला क्रोध आला, आणि त्यानं एक मोठाला खडक टेकडीवरून नानकांकडं लोटून दिला. पण नानकांनी तो खडक केवळ हातानं थोपवून धरला. त्यावेळी त्यांच्या पंजाचा ठसा त्या खडकावर उमटला. म्हणून हे स्थळ पंजासाहिब म्हणून ओळखलं

जाऊ लागलं. शिखांचं पवित्र स्थान असं त्याला स्वरूप आलं. पुढं महाराजा रणजितसिंह याच्या राजवटीच्या काळात त्या ठिकाणी मंदिर व तलाव बांधली गेली.

## १८ देवीव्रत

कार्तिक महिन्यात देवीव्रत करतात. व्रत करणाऱ्यानं दिवसा दुधावर व रात्री फक्त भाजीपाला खाऊन राहायचं असतं. या व्रतात दुर्गादेवीची पूजा व तिळाचा होम करतात.

पाप व रोग यांपासून मुक्ती मिळते, असं फल या व्रताला सांगितलं आहे. या देवीची एक कथा अशी आहे—

प्राचीनकाळी सुरथ नावाचा राजा शत्रूंकडून पराभूत झाला होता. तसाच समाधी वैश्य याला अती धनलोभापायी बायकापोरांनी घराबाहेर हाकलून दिलेलं होतं. तर तो राजा आणि वैश्य योगायोगानं एका अरण्यात एकमेकांना भेटले. त्याच अरण्यात सुमेधा नावाचा ऋषी होता. दोघे मिळून त्याला शरण गेले. आपापली दुःस्थिती सांगून त्यावर काही तरणोपाय सांगा, म्हणून त्याची त्यांनी प्रार्थना केली. ऋषींनी त्यांना दुर्गादेवीची उपासना करायला सांगितलं. दोघांनीही तशी उपासना केली. त्याचं फल म्हणून राजाला पुन्हा राज्यप्राप्ती झाली. तर समाधी वैश्याला मोक्ष लाभला.




## १९ गजपर्व उत्सवाची कथा

दक्षिण भारतात गजपर्व हा उत्सव अय्यंगार ब्राह्मणांच्या स्त्रिया कार्तिक पौर्णिमेपासून तीन दिवस करतात. पौर्णिमेच्या दिवशी सकाळी मातीचा हत्ती बनवून तो फुलांनी सजवतात, व त्याची पूजा करतात. या हत्तीला म्हणतात गजलक्ष्मी.

या उत्सवाबद्दलची कथा आहे, ती अशी—

एकदा महर्षी व्यास हस्तिनापुराला जाऊन गांधारीला भेटले. तिनं त्यांना इष्टसिद्धीसाठी व्रत विचारलं असता, इंद्राच्या ऐरावता-सारख्या हत्तीची पूजा करायला त्यांनी सांगितलं. तसा हत्ती आणा, म्हणून तिनं आपल्या मुलांना सांगितलं. पण कौरवांना काही तसा हत्ती कुठं मिळाला नाही. तेव्हा त्यांनी मातीचा प्रचंड हत्ती बनवला आणि आईच्या पुढं नेऊन उभा केला. गांधारीनं मग नगरातल्या स्त्रियांना बोलावून त्या हत्तीची पूजा केली.



पण या समारंभाचं आमंत्रण गांधारीनं कुंतीला दिलेलं नव्हतं. त्यामुळं कुंतीला साहजिकच वाईट वाटलं. अर्जुनाला हे समजलं, तेव्हा

त्यानं इंद्राकडं प्रत्यक्ष ऐरावताचीच मागणी केली. इंद्रानं ती मागणी मान्य केली. तेव्हा बाणांची शिडी उभारून तिच्यावरून अर्जुनानं ऐरावताला खाली आणलं. कुंतीनं मग गांधारीसह सर्व स्त्रियांना निमंत्रण देऊन बोलावलं; आणि त्यांच्या समक्ष ऐरावताची पूजा केली. त्यावेळी कृष्ण कुंतीला म्हणाला : "दरसाल गजपूजा करणाऱ्या स्त्रियांचे मनोरथ पूर्ण होतील."

## २० पं. जवाहरलाल नेहरू

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील आघाडीचा सेनापती आणि स्वतंत्र भारताचा पहिला लोकप्रिय पंतप्रधान म्हणून पं. जवाहरलाल नेहरू आपल्या कर्तृत्वानं जगभर विख्यात झाले. मोतीलाल नेहरू व स्वरूपराणी यांचा हा सुपुत्र अलाहाबाद इथं १८८९ साली १४ नोव्हेंबर रोजी जन्मला.

इंग्लंडमध्ये केंब्रिज विद्यापीठात पदवी संपादन केल्यावर इंग्लंडातच ते बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण झाले. भारतात परतल्यावर दोनेक वर्षंच वकिली करून कंटाळलेल्या जवाहरलालनी राजकारणात शिरून देशसेवेचं कंकण हाती बांधलं. घरचे सधन असूनही ते साधेपणानं राहू लागले. १९१६ साली कमला कौल यांच्याशी त्यांनी विवाह केला. पुढं इंदिरा ही त्यांना एकुलती एक मुलगी झाली. पुढं गांधीजी आफ्रिकेतून भारतात आल्यावर त्यांनी भारतातल्या ब्रिटिश राजवटीविरुद्ध सत्याग्रहाची व सविनय कायदेभंगाची चळवळ भारतीय काँग्रेसतर्फे सुरू केली, तेव्हा जवाहरलालनी त्यांच्या नेतृत्वाखाली तीत हिरीरीनं भाग घेतला. पुढं १९२९ साली काँग्रेसचं ४४ वं अधिवेशन लाहोरला भरलं, त्याचे जवाहरलाल अध्यक्ष बनले. त्या आधीचे अध्यक्ष त्यांचे पिताजी मोतीलाल यांच्याकडूनच त्यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली. याच अधिवेशनात जवाहरलालजींनी संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीचा पुकार केला.

स्वातंत्र्याच्या आंदोलनात जवाहरलालजींना अनेकदा तुरुंगवास

घडला. त्यांची पत्नी कमला हिनंही स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेऊन तुरुंगवास भोगला. पुढं तिची प्रकृती ढासळली व १९३६ साली ती निधन पावली.

आपल्या पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीत पं. नेहरूंनी पुरोगामी समाजवादी दृष्टिकोन बाळगून मोठमोठी धरणं, पोलादाचे कारखाने वगैरे विकासाची अनेक कामं देशाच्या समृद्धीसाठी घडवून आणली. १९५० सालच्या २६ जानेवारीला स्वतंत्र भारताचं सार्वभौम प्रजासत्ताक राज्य अस्तित्वात आलं, आणि धर्मातीत प्रजासत्ताकाची त्यांची बऱ्याच वर्षांपूर्वीपासूनची कल्पना साकार झाली.

त्यांच्या व्यापक व पुरोगामी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनामुळं त्यांना राष्ट्रीय त्याचप्रमाणं आंतरराष्ट्रीयही मानसन्मान मिळाले.

भारत स्वतंत्र झाल्यापासून म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ पासून १९६४ साली देहावसान होईपर्यंत पं. नेहरूंनी भारताचं पंतप्रधानपद विविधांगी कर्तबगारीनं भूषवलं. आंतरराष्ट्रीय संघर्षात सलोखा घडवून आणण्याचे त्यांचे प्रयत्न नेहमीच चालू असत.

मुलांविषयी पंडितजींना जिव्हाळा वाटायचा. मुलांत ते रमायचे. मुलांबद्दलच्या त्यांच्या आत्मीयतेमुळंच १४ नोव्हेंबर हा त्यांचा जन्मदिन बालदिन म्हणून देशभर मानला जातो.

पं. नेहरू कसे निधड्या छातीचे बेडर नेते होते याची साक्ष देणारी एक गोष्ट सांगण्यासारखी आहे—

हिंदुस्थानला स्वातंत्र्य देताना ब्रिटिशांनी भारत व पाकिस्तान अशा दोन राष्ट्रांत त्याची फाळणी केली. त्यावेळी हिंदु-मुसलमानांच्या दंग्यांना ऊत आला होता. असाच एक दंगा बिहारात चालला असताना तिथं पाहणीसाठी गेलेले पंडितजी बेडरपणे दंगलखोरांत शिरले व एका दंगेखोराच्या हातातला सुरा त्यांनी हिसकावून घेतला.

## २१ रेणुका–तलाव

हिमाचल प्रदेशातील सिरमौर जिल्ह्यात 'रेणुका–तलाव' नावाचं मोठं सरोवर आहे. परशुरामाची माता रेणुका ही या तलावाच्या रूपानं इथं वास करीत आहे, अशी आख्यायिका या भागात प्रचलित आहे. कार्तिक महिन्यात इथं भरणाऱ्या जत्रेला दूरदूरचेसुद्धा भाविक लोक इथं जमतात व रेणुकेची पूजा करतात.

प्राचीन काळी रेणुकेचा पती जमदग्नीऋषी तिच्यासह इथं राहत होता, आणि हिमालयात जाऊन तप करीत बसणारा त्यांचा पुत्र परशुराम वर्षातून एकदा आईबापांना भेटायला इथं येत असे, अशी या भागातल्या लोकांची श्रद्धा आहे. त्या स्मृतिनिमित्त इथं ही जत्रा भरते.

या जत्रेच्या प्रसंगी सजवलेल्या तीन पालख्यांत परशुरामाच्या प्रतिमा ठेवून त्यांची मिरवणूक काढतात. शेवटी रेणुका-तलावात त्यांना स्नान घालून पहाडावरच्या परशुरामाच्या मंदिरात वाजत-गाजत नेऊन स्थापतात.

८

---

## २२ राधाकुंडाची कथा

मथुरेच्या परिसरात–व्रजमंडळात राधाकुंड नावाचं प्राचीन तीर्थं आहे. जवळच कृष्णकुंडही आहे. या कुंडाची कथा अशी –

मथुरेचा राजा कंस याचा अरिष्ट नावाचा सरदार होता. त्याला ठार मारल्यानंतर ज्या कुंडात कृष्णानं स्नान केलं, ते कृष्णकुंड म्हणून ओळखलं जाऊ लागलं. त्या कुंडाशेजारी मग राधेनं एक कुंड बांधलं त्याचं राधाकुंड नाव पडलं.

कार्तिक वद्य अष्टमीच्या मध्यरात्री राधाकुंडात स्नान केल्यास विशेष पुण्य लाभतं, असा भाविक लोकांत समज आहे.



0

## २३ निर्मळ तीर्थ

ठाणे जिल्ह्यात निर्मळ हे एक तीर्थक्षेत्र आहे. इथं एक शिवलिंग, शंकराचार्य विद्याशंकर भारती यांची समाधी आणि विमल व निर्मल नावाचे दोन तलाव आहेत. या तलावासंबंधीची पौराणिक आख्यायिका अशी आहे–

वैतरणा नदीच्या काठी लोमहर्षण ऋषींची मुलगी तप करीत बसली होती. एकदा विमलासुर या दैत्याच्या नजरेला ती पडली. तेव्हा तिच्या रूपावर तो मोहित झाला. आपल्याशी लग्न करण्याचा त्यानं तिला आग्रह केला. पण ती नाकबूल झाली. म्हणून तो तिला ओढून नेऊ लागला. तिनं शिवाचा धावा केला. तेव्हा शिवानं भार्गवरामाला (परशुरामाला) त्या दैत्याचा वध करण्यास सांगितलं. भार्गवरामानं मग त्याचा वध केला. तर त्या दैत्याचं शिर हसत हसत वैतरणेच्या तीरावर पडलं. भार्गवरामानं त्या शिराला हसण्याचं कारण विचारलं तेव्हा त्यानं परशुरामाची स्तुती केली, त्यानं प्रसन्न होऊन त्या दैत्याला वर मागायला सांगितलं. तेव्हा दैत्यानं असा वर मागितला की– " माझा देह जिथं पडला आहे, त्या ठिकाणी तीर्थ निर्माण होऊन त्याला माझं नाव मिळावं. " परशुरामानं 'तथास्तु' म्हटलं.

तेव्हापासून त्या तलावाला विमलतीर्थ नाव पडलं. निर्मल तीर्थाबद्दलही अशीच आख्यायिका सांगतात.

श्रीशंकराचार्यांच्या पुण्यतिथीनिमित्त इथं कार्तिक वद्य एकादशीला यात्रा भरते, ती आठवडाभर चालते.



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. 96860 दि. २८।२।८५
विषय बा.वा. क्र. . . . .

## २४ 'पंजाबकेसरी' लाला लजपतराय

'पंजाबकेसरी' म्हणून गौरवले गेलेले, भारताच्या स्वातंत्र्य-संग्रामातील विख्यात नेते लाला लजपतराय पंजाबातील फिरोजपूर जिल्ह्यात १८६५ साली जन्मले. विद्यार्थी असतानाच त्यांनीं समाजसेवा सुरू केली. पुढं १८८३ साली वकील झाल्यावर एकीकडं तीत नावलौकिक मिळवला, तर दुसरीकडं आर्यसमाजाच्या कार्यात हिरीरीनं भाग घेतला. अस्पृश्योद्धार व दुष्काळनिवारण कार्यासाठी ते झटले, तसंच त्या कामी पैसाही वेचला. पुढं भारतीय काँग्रेसमधे सामील होऊन सक्रीय राजकारणात नेटानं भाग घेतला. स्वदेशी मालाचा पुरस्कार करून परदेशी मालावर बहिष्कार घालण्याची चळवळ त्यांनी पंजाबात जारीनं चालवली. भारतातील इंग्रजी राजवटीच्या अन्याय्य कायद्यांविरुद्ध लेख लिहिल्या-बद्दल सरकारनं त्यांना मंडाले इथं तुरुंगात डांबलं. दोन वर्षांनी तेथून त्यांची सुटका झाली.

बाळ गंगाधर टिळक व बिपिनचंद्र पाल यांच्याबरोबर हिंदी राजकारणाला जहाल वळण देऊन तरुणांना स्फूर्ती देण्याचं कार्य लाला लजपतराय यांनी धडाडीनं केल्यामुळं 'लाल-बाल-पाल' अशी या तिघांची युती त्या काळात जनमानसात एकत्र गुंफली गेली होती.

सुरतेच्या काँग्रेस अधिवेशनात त्यांच्या जहाल गटानं त्यांना अध्यक्ष करायचं ठरवलं होतं; तर फिरोजशहा मेहता यांच्या मवाळ गटानं रास-बिहारी घोष यांची निवड केली होती. शेवटी उभय गटांतील संघर्षामुळं सुरतेचं अधिवेशन मोडलं; व काँग्रेस दुभंग झाली. दोन्ही गटांत समेट घडवून आणण्याचे लजपतराय यांचे प्रयत्न फोल ठरले. त्यानंतर ते इंग्लंड-अमेरिकेत थोडी वर्षं जाऊन राहिले. अमेरिकेत त्यांनी 'इंडियन होमरूल लीग' व 'इंडियन इन्फर्मेशन' अशा दोन संस्था स्थापन केल्या.

पुढं १९२० साली ते भारतात परत आले, तेव्हा त्यांचं भव्य स्वागत होऊन जाहीर सत्कारही झाला. त्यानंतर कलकत्ता इथं झालेल्या राष्ट्रीय सभेच्या जादा अधिवेशनात त्यांची अध्यक्षपदी निवड झाली.

राष्ट्रीय चळवळीसाठी अभ्यासपूर्ण तरुण तयार करण्यासाठी

१९२१ साली लाहोरात 'सर्व्हंट्स ऑफ द पीपल सोसायटी' स्थापन केली. प्रचारासाठी 'पिपल' नावाचं साप्ताहिकही काढलं. त्याच साली असहकारितेच्या चळवळीत त्यांना दोनदा तुरुंगात डांबण्यात आलं. ते काही वर्षं कायदेमंडळावरही निवडून आले होते. हिंदुसंघटनेच्या कार्याचा तर त्यांनी ध्यासच घेतला होता. आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांनी हे कार्य केलं.

पुढं १९२८ साली भारतात आलेल्या सायमन कमिशनविरुद्ध लाहोरात त्यांनी निषेधपर मोठी मिरवणूक काढली. त्यावेळी पोलिसांनी लाठीहल्ला केला, त्यात लालाजींना छातीवर जबर मार बसला. त्यापायी १७ नोव्हेंबर रोजी ते निधन पावले.

अशा प्रकारे, आयुष्यभर मायभूमीसाठी झटत राहिलेल्या या जहाल देशभक्ताला शेवटी स्वातंत्र्य-संग्रामाच्या रणांगणावर लढताना वीरमरण आलं.

लालाजींच्या धैर्याची व सच्चेपणाची अशी गोष्ट सांगतात की, लाहोरच्या त्या अमानुष लाठीहल्ल्याच्या वेळी त्यांच्या काही अनुयायांनी, त्यांचा लाठीमार चुकावा म्हणून त्यांना बाजूला घेऊन जाण्याचा प्रयत्न केला, पण या बेडर पुरुषोत्तमानं धैर्यशील नेत्याला साजेसंच वर्तन केलं. अनुयायांचा बेत डावलला आणि इतरांबरोबर स्वतःही लाठीमार पत्करला– स्वातंत्र्यवीराच्या ईर्ष्येनं धीरानं सोसला.

## २५ जगद्धात्रीची कथा

बंगालमधे जगद्धात्री नावाची शक्तिदेवता आहे. कार्तिक शुद्ध सप्तमीपासून नवमीपर्यंत हिचा उत्सव साजरा होतो. हिच्याबद्दलची कथा अशी आहे–

इंद्र वगैरे देवांना एकदा आपल्या सामर्थ्याचा गर्व वाटू लागला. दुर्गादेवीला ही गोष्ट रुचली नाही. त्यांचा गर्व उतरवण्यासाठी तिनं जगद्धात्रीचं रूप धारण केलं. ते रूप पाहून सर्व देव भयभित झाले. 'ही देवी आहे तरी कोण?' हे जाणून घेण्यासाठी त्यांनी वायूला तिच्याकडं पाठवलं.

तो तिच्यापुढं जाऊन थरथरत उभा राहिला. वायूला तिनं रोखठोक सवाल केला, "या जगाला पेलण्याची ताकद आहे का तुझ्यात? असली तर समोरची ती गवताची काडी उचलून दाखव पाहू." वायू ती क्षुल्लक गोष्ट मानून काडी उचलू लागला, पण शिकस्त करूनही त्याला ती काडी उचलणं जमेना. तो निराश होऊन देवांकडं परतला. मग देवांनी अग्नीला तिच्याकडं रवाना केलं. जगद्धात्रीनं तीच गवताची काडी अग्नीला जाळून दाखवायला सांगितलं, पण शिकस्त करूनही त्याला ते काम जमलं नाही. तेव्हा तोही ओशाळून देवांकडं परतला. आता मात्र देवमंडळी हतबुद्ध झाली आणि मुकाटयानं तिला शरण जाऊन प्रार्थना केली, "जगन्माते, आमच्यावर कृपा कर आणि तुझ्या मूळ रूपाचं आम्हाला दर्शन घडव."

मग सिंहावर आरूढ झालेल्या, लाल वस्त्र ल्यालेल्या, अलंकार घातलेल्या, चतुर्भुज व त्रिनेत्री, तेजस्वी, हसतमुख जगन्मातेचं दर्शन तिनं देवांना घडवलं.

## २६ चिक्कू शिंपी!

कोण एके काळी एका गावात एक शिंपी आपल्या बायकोसह राहत होता. दोघंही कमालीची चिक्कू होती. कुणा पाहुण्यांना ती आपल्या घरी थारा देत नसत.

एके दिवशी अचानक दोघे पाहुणे त्यांच्या घरी येऊन ठेपले. 'चार दिवस राहतो', म्हणाले. ते नात्यातले होते; त्यामुळं त्यांना कसा नकार द्यावा हे शिंप्याला सुचेना. तरीपण डोकं चालवून त्यानं पाहुण्यांना लौकर घालवून लावण्याची एक शक्कल शोधून काढली.

दुसऱ्याच दिवशी पाहुणे बाहेर फिरायला गेले असताना शिंपी आपल्या बायकोला म्हणाला, "हे बघ, पाहुणे परत येतील, तेव्हा मी तुला शिवीगाळ सुरू करीन. त्यावर तू उलट आरडाओरड करायची. मग मी तुला मारण्यासाठी हातात काठी घेईन. तेव्हा मग तू पिठाचा

डबा घेऊन घराबाहेर धावत पळत निघून जायचं. मी तुझ्या मागं धावेन. हा प्रकार पाहून पाहुणे समजतील की, आपण भांडखोर आहोत; अशा घरात राहणं नको आणि ते लगेच निघून जातील. "

शिंप्याच्या बायकोला नवऱ्याचा डाव पसंत पडला. पाहुणे फिरून परत आले, तसं ते चिक्कू जोडपं लगेच भांडायला लागलं. नवऱ्याची शिवीगाळ, तर बायकोची आदळआपट, आरडाओरड सुरू झाली. नवऱ्यानं तिला मारायला काठी उचलली, तर बायको पिठाचा डबा घेऊन घराबाहेर धावली. लगेच नवरा तिच्या मागं लागला.

दोघेही पाहुणे शिंप्याला चांगले ओळखून होते. नवरा-बायको भांडत घराबाहेर पडलेली पाहून एक पाहुणा दुसऱ्याला म्हणाला, " ही दोघंही नवरा-बायको पक्की चिक्कू, कवडीचुंबक आहेत. केवळ आम्हाला घरातून घालवून लावण्यासाठी त्यांनी भांडणाचं हे नाटक आरंभलं आहे, पण आपण यांच्या बहाण्याला फसता कामा नये. आपण असं करू या. वर माडीवर जाऊन बसू या. थोड्या वेळानं नवरा-बायको बेशक घरी परततील."

थोड्या वेळाने शिंपी नि त्याची बायको घरी परतली. पाहतात तर घरात सामसूम. ओटचावरच जोडीनं बसत दोघंही खदखदून हसली. शिंपी हसून म्हणाला, " बघ, पाहुणे पसार झाले. आपला डाव यशस्वी झाला. "

बायकोनंही त्याच्या चतुराईचं कौतुक केलं.

शिंपी बोलला, " किती छान नाटक वठवलं आपण, नाही ? तू पण चांगली हुशारी दाखवलीस. "

तोवर माडीचा जिना उतरत पाहुणे हसत बोलले, " आम्हाला पण नाटक आवडलं तुमचं. तुमचं नाटक चाललंय तोवर विश्रांती घ्यावी म्हणून माडीवर जाऊन झोपलो आम्ही. "

पाहुण्यांनी आपल्या हुशारीवर कडी केलेली पाहून नवरा-बायको खजिल झाली. मनातून त्यांचा मारे जळफळाट उडाला, पण करतात काय ? आता इलाज उरला नव्हता. पाहुण्यांना मुकाट्यानं जेवू घालावं लागलं.

## २७ विष्णुपंचक व्रतकथा

कार्तिक महिन्याच्या शेवटच्या पाच दिवसांना विष्णुपंचक म्हणतात. या व्रतात उपवास करून राधादामोदरांची पूजा करतात. या व्रताची कथा अशी आहे—

एका गावात दंडकर नावाचा माणूस नेहमी चोऱ्या करायचा. गावच्या लोकांना त्याचा फार जाच होऊ लागल्यानं गावकऱ्यांनी त्याला गावाबाहेर हाकललं. तो थेट अरण्यात गेला नि दरोडेखोरांच्या एका टोळीत सामील झाला. त्यांच्याबरोबर वाटमारी करू लागला. या दरोडेखोरांचा फारच उपद्रव होऊ लागला. तेव्हा लोकांनी तिकडच्या वाटेनं जाणं-येणं बंदच करून टाकलं. साहजिकच दरोडेखोरांना काही-एक मिळकत मिळेनाशी झाली, त्यांची उपासमार होऊ लागली. उपासमारीनं हैराण झालेला दंडकर एकदा अरण्यात हिंडत होता. तर आवळीच्या एका झाडाखाली काही माणसं गोळा झालेली त्याच्या नजरेस पडली. त्यांच्यावर हल्ला करण्याची यावेळी त्याची कुवत नव्हती, कारण उपासमारीनं तो बराच अशक्त झाला होता. त्यांच्याजवळ जाऊन तो काही-तरी खायला मागू लागला. पण ' विष्णुपंचकव्रतामुळं आम्हाला उपवास आहे,' असं त्या मंडळीनं सांगितलं. दंडकरला वाटमारी करण्याचा आता उबग आला होता. आपल्याला उपवास घडलेलाच आहे; तर या मंडळींप्रमाणं ते व्रत आपणही करावं, असं त्याच्या मनानं घेतलं. म्हणून त्यानं या व्रताची माहिती त्यांच्याकडून विचारून घेतली. मग त्यानं आजवरच्या आपल्या करणीबद्दल क्षमायाचना करून भक्तिभावानं ते व्रत केलं. त्यामुळं मिळालेल्या पुण्यानं त्याचा उद्धार झाला.

▭

# २८ ज्ञानेश्वरांची समाधी

ज्ञानेश्वरी (भावार्थ दीपिका) या महान ग्रंथाचे कर्ते, महाराष्ट्रातल्या भक्तिपंथाचे प्रवर्तक संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरमहाराज यांनी वयाच्या अवघ्या बावीसाव्या वर्षी– शके १२१८ मध्ये कार्तिक वद्य त्रयोदशीला पुण्यानजीक आळंदी येथे जिवंत समाधी घेतली. त्यावेळी नामदेव आदी अनेक संतमंडळी ज्ञानेश्वरांच्या अखेरच्या दर्शनासाठी आळंदीला जमली होती. ज्ञानेश्वर समाधिस्थानाच्या पायऱ्या उतरून योजलेल्या आसनावर पद्मासन घालून उत्तरेकडं तोंड करून बसल्यावर समाधीच्या द्वारावर शिळा बसवण्यात आली. त्यावेळी जमलेल्या सर्व संतांनी दुःखानं दाटून आलेल्या कंठानं ज्ञानेश्वरांचा जयजयकार केला व समाधीवर पुष्पवृष्टी केली.

संत एकनाथांच्या काळी, ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्याला तीनशें वर्षं होऊन गेली होती. मध्यंतरीच्या काळात त्या समाधीच्या जागेवर दाट रान माजलेलं होतं. ज्ञानेश्वरांची समाधी तिथं आहे, याची जाणीवसुद्धा कुणाला असलेली दिसत नव्हती. एके दिवशी एकनाथांना स्वप्नात ज्ञानेश्वरांचा दृष्टान्त झाला. त्याला अनुसरून, काही मंडळी सोबत घेऊन एकनाथ आळंदीला गेले. समाधीच्या जवळपासची झाडी बरोबरच्या मंडळींकडून त्यांनी साफ करून घेतली. मग ज्ञानेश्वरांच्या समाधीचं दार उघडून त्यांनी प्रत्यक्ष समाधिस्थानात प्रवेश केला. तर, समाधीजवळच्या अजानवृक्षाची मुळी ज्ञानेश्वरांच्या गळ्याला लागलेली त्यांना दिसली. नाथांनी ती मुळी हलक्या हातानं दूर केली. ही आख्यायिका वारकरी मंडळीत प्रचलित आहे. पण मधल्या काळात ज्ञानेश्वरीच्या पोथीची आबाळ झाली होती, तिची शुद्ध प्रत तयार करण्याची प्रेरणा ज्ञानेश्वरांनी दृष्टान्त देऊन नाथांना दिली, असं दिसतं. कारण नाथांनी ज्ञानेश्वरीच्या शक्यतेवढ्या हस्तलिखित पोथ्या मिळवल्या आणि त्यांच्यावरून ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत तयार केली, ही वस्तुस्थिती आहे. नाथांनी संशोधन करून तयार केलेली ज्ञानेश्वरीची आवृत्तीच सध्या महाराष्ट्रात प्रचलित आहे.

# २९ इंदिरा गांधी

—स्वतंत्र भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी, त्यांचे पिताजी (स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान) पं. जवाहरलाल यांच्या एकुलत्या एक सुकन्या. तब्बल चौदा वर्षं कर्तबगार पंतप्रधान म्हणून जागतिक कीर्ती मिळवणाऱ्या इंदिरेचा जन्म १९१७ साली नोव्हेंबरच्या १९ दिनांकाला झाला.

म. गांधींच्या स्वातंत्र्याच्या चळवळीत हिरीरीनं सामील झालेल्या नेहरू कुटुंबियांप्रमाणं इंदिरेनंही लहानपणापासूनच त्या चळवळीला यथाशक्ती साथ दिली. सत्याग्रहात भाग घेतल्यानं हाल सोसाव्या लागा णाऱ्या देशभक्तांना मदत करण्यासाठी वयाच्या अवघ्या बारा-तेराव्य-वर्षी इंदिरेनं लहानमुलांची ‘वानरसेना’ उभारली होती. तीत सामील झालेल्या शेकडो मुलांनी प्रभातफेऱ्या काढून, स्वातंत्र्याची गीते गाऊन अलाहाबाद शहरात धूमधाम उडवून दिली होती.

इंदिरेचं मॅट्रिकपर्यंतचं शिक्षण पुण्यात झालं; तर नंतरचं शिक्षण कविश्रेष्ठ रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतनमधे आणि स्वित्झर्लंड व इंग्लंडमधील ऑक्सफर्ड विद्यापीठात झालं. (ती शांतिनिकेतनमधे अस-तानाच, १९३६ साली तिची आई कमलादेवी निधन पावली.)

दुसरं महायुद्ध सुरू झाल्यावर ती इंग्लंडहून भारतात परतली आणि म. गांधींच्या स्वातंत्र्याच्या चळवळीत सामील झाली. १९४२ सालच्या ‘छोडो भारत’ चळवळीत तिनं अनेक प्रकारची महत्त्वाची कामगिरी बजावली.

याच्या थोडं आधी स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेणाऱ्या फिरोज गांधी या तडफदार तरुणाचा सहवास तिला घडला. या सहवासाचं रूपां-तर उभयतांचं प्रेम जमण्यात झालं. आणि मग १९४२ साली मार्चच्या २६ दिनांकाला या दोघांचा विवाह झाला.

नंतर १९४२ सालच्या ऑगस्टमधे सुरू झालेल्या ‘छोडो भारत’ चळवळीत दोघांनीही हिरीरीनं भाग घेतला व तुरुंगवासही भोगला. तुरुंगवासातून सुटून आल्यावर १९४४ साली इंदिरा गांधींना राजीव

हा पहिला मुलगा झाला. तर १९४६ साली संजीव हा दुसरा मुलगा झाला.

पुढं १९४७ साली ऑगस्टच्या १५ दिनांकाला भारत स्वतंत्र झाला व पं. जवाहरलाल नेहरू स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान झाले. यावेळी पंतप्रधान म्हणून पं. नेहरूंच्या 'तीनमूर्ती' या घरी रोज शेकडो माणसं येत. त्यांची व्यवस्था इंदिरा गांधींनी तत्परतेनं, दक्षतेनं सांभाळली. जवळजवळ अठरा वर्षे त्यांनी पित्याची सर्व प्रकारे देखभाल केली. पंतप्रधान या नात्यानं पं. नेहरूंनी परदेशांत दौरे केले, तेव्हा इंदिराजी नेहमी त्यांच्याबरोबर असत. या दोऱ्यांत त्यांना खूप अनुभव लाभला. कित्येक ठिकाणी खुद्द त्यांना बहुमानाचे किताबही मिळाले.

हिंदुस्थानच्या फाळणीच्या वेळी पाकिस्तानात झालेल्या दंगलीतून हजारो निर्वासित कसेबसे निसटून भारतात आले. त्यावेळी त्यांच्यातला एकजण, एका लहानग्या मुलीला बरोबर घेऊन एकदा इंदिराजींकडं आला. त्या रूपवान मुलीचे दोन्ही पाय तुटलेले होते. त्याबद्दल इंदिराजींनी आस्थेनं चौकशी केली, तर पाकिस्तानातील दंगलीत ते कापले गेल्याचं त्या माणसानं सांगितलं. एका निष्पाप मुलीवर असा प्रसंग यावा याचं इंदिराजींना दुःख झालं. त्यांना त्या मुलीची दया आली आणि खटपट करून त्यांनी त्या मुलीला कृत्रिम पाय मिळवून देण्याची व्यवस्था केली. पुढं मोठी झाल्यावर त्या मुलीचं लग्न ठरलं, तेव्हा ती मुद्दाम इंदिराजींना येऊन भेटली. ती वार्ता ऐकून त्यांना खूप समाधान वाटलं.

अशा प्रकारे संसार सांभाळून देशकार्य साधीत असताना १९५९ साली इंदिराजींचे पती फिरोज गांधी निधन पावले. ते दुःख सोसून त्यांनी देशकार्याला जास्त प्रमाणात वाहून घेतलं. १९६० साली इंदिराजींनी काँग्रेसचं अध्यक्षपद पत्करलं. या पदावर असताना जबाबदारीची कामं करून त्यांनी आपली कार्यक्षमता सिद्ध करून दाखवली.

या काळात एकदा रस्त्यात एक मुलगा 'कंगवा घ्या' म्हणून इंदिराजींच्या मागं लागला. त्याच्या आग्रहाखातर त्यांनी त्याच्याकडून एक कंगवा घेतला. एक लहान मुलगा हे काम करीत असलेला पाहून कुतूहलानं त्यांनी त्याची चौकशी केली, तर गरिबीमुळं शाळेत शिकता

यत नसल्याचं तो म्हणाला. ते ऐकून इंदिराजींना वाईट वाटलं. अशा गरीब मुलांना मदत करता यावी म्हणून मग त्यांनी 'बालसहयोग' ही संस्था काढली.

इंदिराजी कर्तबगार तशाच धाडसी होत्या. हिंदुस्थानच्या फाळणीनंतरची गोष्ट. त्यांनी अनेक निर्वासितांची सोय केली. तरीपण काही निर्वासित खवळले होते. त्यांच्यातला एकजण एकदा संधी साधून पं. नेहरूंच्या घरात एका खोलीत सुरा घेऊन लपून बसला होता. इंदिराजी त्या खोलीत गेल्या तेव्हा तो त्यांना आढळला. त्यांनी प्रसंगावधान राखून त्याला ढकलून दिलं व त्याच्या हातचा सुरा काढून घेऊन त्यानीं त्याला पोलिसांच्या स्वाधीन केलं.

संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य व्हावी यासाठी त्यांनी पं. नेहरूंचं मन वळवलं. म्हणून महाराष्ट्र त्यांचा ऋणी राहील.

पं. नेहरू १९६४ साली निधन पावल्यावर लालबहादुर शास्त्री पंतप्रधान झाले. त्यांनी इंदिराजींना केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्रीपद दिलं. पुढं १९६६ साली शास्त्रीजींच्या निधनानंतर तर पंतप्रधान म्हणून त्यांचीच निवड झाली.

इंदिराजींच्या पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीत पूर्व बंगालला पाकिस्तानपासून स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कामी, भारतीय सैन्य पाठवून त्यांनी बजावलेली कामगिरी विशेष महत्त्वाची होती. यावेळच्या त्यांच्या कर्तबगारीमुळं पूर्व बंगाल स्वतंत्र होऊन त्याचा 'बांगला देश' बनला. यानंतर १९७१ साली राष्ट्रपतींनी इंदिराजींना 'भारतरत्न' हा सर्वोच्च मानाचा किताब दिला.

परदेशांतही अनेक बहुमान देऊन इंदिराजींचा गौरव करण्यात आला. अमेरिकेत १९५३ साली 'मातृपारितोषिक' देण्यात आले, तर येल विद्यापीठातर्फे १९६० साली 'हॉलंडस्मारक' हे पारितोषिक देण्यात आले. पुढं रोममधे 'इझाबेल द एस्टे' हे पारितोषिक १९६५ मधे मिळालं. रोमन अकादमीनं तर त्यांना 'राजधुरंधर महिला' म्हणून गौरवलं.

१९७१ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसपक्ष प्रचंड

बहुमतानं निवडून आला. देशाच्या सत्तेवर आलेल्या या पक्षानं अर्थातच इंदिरा गांधींना पुन्हा पंतप्रधान म्हणून निवडलं. पण १९७५ साली २५ जूनला अलाहाबाद उच्च न्यायालयानं इंदिराजींची लोकसभेतील निवडणूक, काही तांत्रिक कारणावरून अवैध ठरवली, तरीपण त्या पंतप्रधानपदाला चिकटून राहिल्या. यावर देशभर खूप काहूर उठलं. त्यावर मात करण्यासाठी इंदिरा गांधींनी १९७५ साली २६ जूनला देशभर आणीबाणी पुकारली. अखेर १९७७ साली त्यांनी सार्वजनिक निवडणूक घेतली. पण आणीबाणीच्या काळात अनेक प्रकारची दडपशाही झाल्यानं या निवडणुकीत काँग्रेसपक्ष अल्प मतात गेला. एवढंच नाही तर खुद्द इंदिरा गांधी पराभूत झाल्या. प्रमुख विरोधी पक्षांनी एकजूट करून बनवलेला जनता पक्ष केंद्रीय सत्तेवर आरूढ झाला.

पण जनता पक्षात फाटाफूट होऊन अवघ्या तीन वर्षांत त्या पक्षाची सत्तेवरून उचलबांगडी झाली. आणि १९८० साली झालेल्या मध्यावधी निवडणुकीत काँग्रेसपक्ष पुन्हा प्रचंड बहुमतानं निवडून आला. इंदिरा गांधीही निवडून येऊन पुन्हा पंतप्रधान बनल्या. आपली नवीन कारकीर्द त्यांनी अनेक प्रकारे गाजवली. मोठी आंतरराष्ट्रीय कीर्तीही त्यांनी मिळवली.

पण दुर्दैव असं की, शिखांसाठी पंजाबात स्वतंत्र खलिस्तान निर्माण करावं, अशी मागणी करणाऱ्या काही अतिरेकी शिखांचे हस्तक असलेल्या, खुद्द इंदिरा गांधींचे शरीररक्षक असलेल्या दोघा शिखांनी त्यांच्या घराच्या दारातच त्यांच्यावर गोळ्या झाडून त्यांना ठार मारलं. ही निर्घृण हत्या घडली. १९८४ साली ३१ ऑक्टोबर रोजी. या हत्येमुळं साऱ्या भारत देशालाच काय, पण अखिल जगाला धक्का बसला. सगळी मानवजात कमालीची हळहळली. शोकात बुडाली. भारत एका निर्भय तडफदार नेतृत्वाला मुकला.

## ३० शूर वीराबाई

राणा प्रतापसंग याच्या निधनानंतर अकबर बादशहानं राजपुतांच्या चितोड शहरावर आपल्या प्रचंड सेनेनिशी स्वारी केली. त्यावेळी उदयसिंह हा महाराणा राज्य करीत होता. हा राणा कमालीचा भित्रा होता. अकबर बादशहा चितोडवर एकाएकी चालून येतोय हे कळताच या राण्याची घाबरगुंडी उडाली. बादशहाच्या प्रचंड सेनेला तोंड द्यायचा धीर त्याला होईना. त्याचे सरदार शूर राजपूत होते. महापराक्रमी बाप्पा रावळ, हम्मीर शाडो, कुंभोराणा, समरसिंह अशा वीरांनी गाजवलेले पराक्रम सांगून त्यांनी उदयसिंहाला युद्धास सज्ज होण्यासाठी खूप समजावलं. तरीसुद्धा त्याचा भित्रेपणा जाईना. तेव्हा अखेर ते सरदार संतापून निक्षून म्हणाले–

"तुम्ही शत्रूला तोंड द्यायला आला नाहीत, तर तुम्हाला आम्ही गादीवरून खाली खेचू !"

सरदारांचा तो निश्चय पाहून उदयसिंह नाइलाजानं शत्रूशी लढायला तयार झाला. उसन्या धैर्यानं स्वारी रणमैदानावर तर जाऊन दाखल झाली, पण समोरचं अफाट मोगल सैन्य पाहून स्वारीचं धाबं दणाणलं. हात-पाय गळाले. तरीपण आपल्या सरदारांचा इशारा आठवून महाराणा या नात्यानं उदयसिंहानं आपल्या सैन्याला एकदाचा लढण्याचा हुकूम दिला.

लढाईची धुमश्चक्री सुरू झाली: मोगल सैन्य अफाट होतं तरीसुद्धा शूर राजपूत वीर निधड्या छातीनं लढत होते. दोन-तीन वेळा त्यांनी शत्रुसैन्याला मागं हटवलंसुद्धा. परंतु त्यांचा सेनानायकच खचलेल्या मनाचा असल्यानं त्यांना उत्तेजन मिळत नव्हतं. सेनानायकच कचखाऊ असल्याचं धूर्त अकबरानं लौकरच हेरलं आणि शिताफीनं खुद्द त्यालाच एकांडं पाडून कैद केलं. सेनानायकावरच कैद होण्याची पाळी आलेली पाहून मग मात्र राजपूत सैनिकांचा धीर खचला. आवेश ओसरला. आता मोगल सैन्याच्या हल्ल्यापुढं त्यांना माघार घ्यावी लागली. निराश होऊन ते माघारी परतले.

पण ते पराभूत होऊन घरी परतलेले पाहून राजपूत स्त्रियांनी त्यांची निर्भर्त्सना केली, "राजपूत कुळात जन्म घेऊन रणांगणावरून असे पळपुटयांसारखे पळून येता ? तुमची काळी तोंडं आम्हाला दाखवू नका. एक तर जय मिळवून या; नाहीतर वीराचं मरण पत्करा. तरच तुमच्या जन्माचं सार्थक होईल !"

आणि एवढं वाक्ताडन करून त्या थांबल्या नाहीत, तर त्यांना घराबाहेर काढून त्यांनी आपापले दरवाजे बंद केले.

उदयसिंहाला कैद केल्याच्या वार्तेनं राजवाडयावर दुःखाची छाया पसरली. हाहाकार उडाला. माघारी परतलेले राजपूत वीर दरबारात जमले. महाराण्याची सुटका शत्रूच्या छावणीतून कशी करावी, पराभवाचा वचपा कसा काढावा, यासंबंधी ते विचारविनिमय करू लागले.

उदयसिंहाची पत्नी वीराबाई आपल्या महालात विचारमग्न झाली. 'माझ्या पतीला मोगलांनी कैद केलं. राजपुतांचा पराभव झाल्यानं आता चितोड मोंगलांच्या ताब्यात जाणार. आम्हालाही त्यांच्या ताब्यात रहावं लागणार !' भिंतीवर काही शस्त्रं लटकावलेली होती. ती नज-रेला पडताच तिचं धैर्य व शौर्य उफाळून वर आलं. मग वेळ न दवडता तिनं लढाईचा मर्दानी पोषाख चढवला, आणि ढाल-तलवार व भाला घेऊन ती तडक दरबारात येऊन दाखल झाली. तिचं ते उग्र रूप पाहून दरबारातल्या वीरपुरुषांत खळबळ माजली. आसनावर न बसताच, ताठ उभं राहून ती गरजली—

"शूर राजपूत वीरांनो, तुमचं शौर्य, तुमचा पराक्रम, तुमचा स्वाभिमान ही सारी तुम्हाला सोडून गेली की काय ? शत्रूला पाठ दाखवून तुम्ही माघारी कसे फिरलात ? आपल्या महाराजांना शत्रूनं कैद केलं असताना स्वस्थ बसून तुम्ही काय करत आहात ? सरदार हो, तुम्ही शूरवीर आहात. नामर्दपणाचा कलंक धुऊन काढण्यासाठी तुम्हाला ताबडतोब आत्ताच्या आत्ता, तातडीनं रणांगणात उतरायला हवं. चला ! तुमचं खरं शौर्य दाखवा ! मी स्वत: चाललेय !"

आणि ती शूर स्त्री एका चपळ घोडीवर बसून दौडत निघाली. तिच्या वीरश्रीपूर्ण वागणुकीनं सर्व राजपूत वीरांत नवचैतन्य संचारलं.

नव्या जोमानं ते वीराबाईच्या पाठोपाठ "जय हर ! जय हर !" अशा घोषणा करीत रणांगणावर जाऊन दाखल झाले.

त्या राजपूत वीरांसह वीराबाई शत्रूच्या छावणीवर बेधडक तुटून पडली. विजयाच्या धुंदीत बेसावध असलेल्या बादशहाच्या सैनिकांची धांदल उडाली. ते लढायला तयार होईपर्यंत, वीरश्री संचारलेल्या रजपूत वीरांनी अर्धेअधिक मोगल सैनिक कापून काढले. तेजस्वीपणे राजपूत सैन्याचं नेतृत्व करणाऱ्या वीरबाईसह राजपूत वीरांनी शर्थीनं पराक्रमाची कमाल केली. मोगलसेनेची दाणादाण उडाली. खुद्द अकबर बादशहा हा प्रकार पाहून हतबुद्ध झाला. जिवाच्या भयानं पळून जाऊ लागलेल्या मोगल सैनिकांना थोपवून धरायला तो असमर्थ ठरला. अखेर पराभव पत्करून त्यानं नामुष्कीनं तह करण्याची तयारी दर्शवणारा शुभ्र बावटा फडकवला. प्रथम त्यानं उदयसिंहाला कैदेतून मुक्त केलं, आणि राजपुतांच्या मारगीरीच्या कचाट्यातून बचावलेल्या मोगल सैनिकांना बरोबर घेऊन शरमिंद्या तोंडानं तो माघारी परतला.

विजयी राजपूत सेना व उदयसिंह यांना बरोबर घेऊन शूर वीराबाई जयघोषांत चितोडमध्ये दाखल झाली, चितोडचा सारा जनसागर आनंदानं उचंबळला. शूर वीराबाईच्या जयजयकारानं आकाश दुमदुमून गेलं. तिनं दाखवलेल्या तेजस्वी बाण्यानं पराभवाच्या गर्तेतून डोकं वर काढून विजय खेचून आणला होता.

## ३१ भीष्मपंचक व्रतकथा

कार्तिक शुद्ध एकादशीपासून पौर्णिमेपर्यंत विष्णू व भीष्म यांच्या पूजेचं हे व्रत करतात. या व्रताची कथा अशी आहे–

भारतीय युद्ध संपल्यावर श्रीकृष्ण, शरपंजरी पडून राहिलेल्या भीष्माकडं पांडवांसह गेला. त्यावेळी श्रीकृष्णानं भीष्माचार्यांना विनंती केली, की धर्मराजाला काही उपदेशपर सांगावं. ती विनंती मान्य करून राजधर्म, वर्णधर्म, मोक्षधर्म, अशा विविध धर्मांना अनुलक्षून भीष्माचार्यांनी धर्माला सतत पाच दिवस उपदेशपर कथन केलं. त्यानंतर श्रीकृष्णानं संतुष्ट होऊन भीष्मांना सांगितलं : "तुमची स्मृती म्हणून आजच्या तिथीपासून हे पाच दिवस भीष्मपंचकव्रत म्हणून नावारूपाला येईल असं मी करीन."

## ३२ जगदंबा शांतादुर्गा

गोमंतकातील कवळे (कैवल्यपूर) या गावी शांतादुर्गेचं प्रसिद्ध देवस्थान आहे. या देवतेची जन्मकथा अशी आहे–

एकदा हरि-हरांचा तुंबळ संग्राम चालला होता. दोघेही तुल्यबळ असल्यानं त्यांच्यातल्या एकाचीही सरशी होण्याची चिन्हं दिसेनात. परस्परांवर त्यांनी चालवलेल्या शस्त्रास्त्रांच्या भयंकर माऱ्यामुळं पृथ्वी प्रलयाला जाते की काय, अशी भीती निर्माण झाली. तेव्हा जगाच्या रक्षणासाठी ब्रह्मदेवानं जगदंबेला आवाहन केलं. ती युद्धाच्या ठिकाणी प्रकट झाली आणि तिनं हरि-हरांना शांत करून युद्ध थांबवायला लावलं. अशा प्रकारे शांतता प्रस्थापित करण्याचं कार्य केल्यानं जगदंबेच्या या अवताराला शांतादुर्गा मानलं जाऊ लागलं. जगदंबेची शांतादुर्गा झाली ती अशी.

शांतादुर्गेचं कवळे येथील देवालय भव्य असून कवळे गावच या देवस्थानाला इनाम मिळालेला आहे. ▭

---

## ३३ राई-दामोदर

ओरिसात मुख्यतः विधवा स्त्रिया कार्तिक महिनाभर राई-दामोदर नावाचं व्रत करतात. या व्रतात फक्त एक वेळ जेवून राई-दामोदराची पूजा रोज करायची असते. या व्रताविषयीची कथा अशी आहे–

पूर्वीच्या काळी पुरी इथल्या जगन्नाथ मंदिराच्या पुजाऱ्याला राई म्हणून मुलगी होती. ती त्यानं जगन्नाथाला समर्पण केली. तर तिनं महालक्ष्मीची प्रार्थना करून मागणं मागितलं की, 'वर्षातून किमान महिनाभर तरी जगन्नाथाबरोबर माझी पूजा व्हावी.' लक्ष्मीनं तिची प्रार्थना मान्य केली.

तेव्हापासून पुढल्या जन्मी सौभाग्य लाभावं म्हणून विधवा स्त्रियांनी राई-दामोदराची संयुक्त पूजा करण्याची प्रथा रूढ झाली.

▭

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय व ...
वा. क्र. ९७६०  दि. २८।२।८५
विषय ...कथा...  क्र. ........
BVBK-0401760